रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ३११
www.ramprahar.com

गुरुवार, २९ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग


सुरक्षित प्रवासासाठी आता एआय आधारित स्मार्ट बस/२

श्रीवर्धन तालुक्यात वादळी पावसाने दाणादाण/५

मास्टर ॲथलेटिक्समध्ये उत्तम माने यांना 'कांस्य'/८

## सीमेलगतच्या राज्यांमध्ये आज मॉक ड्रिल

**नवी दिल्ली :** पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राज्यांमध्ये गुरुवारी (दि. २९) नागरी संरक्षण मॉक ड्रिल घेण्यात येणार आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये शस्त्रसंधी असूनही दोन्ही देशांमध्ये तणाव कायम आहे. दरम्यान, गुरुवारी हरियाणा, चंदीगड, जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात मॉक ड्रिल करण्यात येणार आहे. पंजाबमध्ये मात्र ३ जून रोजी संध्याकाळी ७.३० वाजल्यापासून मॉक ड्रिल होणार आहे. मॉक ड्रिल दरम्यान, लोकांना युद्धादरम्यान कसे टिकून राहायचे हे शिकवले जाईल. यासोबतच ब्लॅकआउट आणि हल्ल्यादरम्यान वाजणाऱ्या सायरनबद्दल माहिती देण्यात येईल. लोकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात येतील. यापूर्वीही एकदा मॉक ड्रिल करण्यात आले होते, पण त्यामध्ये काही त्रुटी समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर ही दुसरी मॉक ड्रील होणार आहे.




### मोदी सरकारचे शेतकऱ्यांना मोठे गिफ्ट

# खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २८) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत २०२५-२६च्या खरीप पणन हंगामासाठी भातासह १४ प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) वाढ करण्यात आली. यासाठी दोन लाख सात हजार कोटी रुपये एवढा खर्च येणार आहे.





केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, सरकारने २०२५-२६च्या खरीप हंगामासाठी तांदळाच्या किमान आधारभूत किमतीत (एमएसपी) ६९ रुपयांची वाढ करून ती २,३६९ रुपये प्रति क्विंटल करण्यास मान्यता दिली आहे. ग्रेड-ए धानाची किमान आधारभूत किंमत २,३८९ रुपये प्रति क्विंटल असणार आहे. नायजर बियाण्याच्या एमएसपीत सर्वाधिक प्रति क्विंटल ८२० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. नाचणी ५९६, कापूस ५८९, तिळ ५७९, तूर ४५० आणि उडीदच्या एमएसपीत ४०० रुपयांची वाढ केली आहे.

कापसाच्या किमान आधारभूत किमतीतही लक्षणीय ५८९ रुपयांची वाढ करण्यात आली. यामुळे मध्यम आकाराच्या कापसाची आधारभूत किंमत ४,०१० रुपये प्रति क्विंटल, तर लांब फायबर कापसाची किंमत प्रति क्विंटल ४,११० रुपये असेल. या वाढीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना चांगला भाव मिळेल व त्यांचे उत्पन्न वाढेल.

### व्याज सवलत कायम

केंद्रीय मंत्रिमंडळाने सुधारित व्याज अनुदान योजना सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे. ही योजना किसान क्रेडिट कार्ड (केसीसी)द्वारे शेतकऱ्यांना कमी व्याजदराने अल्पकालीन कर्ज प्रदान करते. केसीसीद्वारे शेतकरी ७% व्याजदराने तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज घेऊ शकतात, ज्यामध्ये बँकांना १.५% व्याज अनुदान मिळते. वेळेवर कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ३%पर्यंत प्रोत्साहन मिळते. म्हणजेच त्यांचे व्याज फक्त ४%पर्यंत कमी केले जाते. पशुपालन किंवा मत्स्यपालनासाठी घेतलेल्या कर्जावर फक्त दोन लाख रुपयांपर्यंत व्याज लाभ लागू आहे.

# फार्महाऊसवर पशुपालनाच्या नावाखाली ड्रग्जची फॅक्टरी

### कर्जतमध्ये सहा जणांना अटक, २५ कोटींचा मुद्देमाल जप्त

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांनी कर्जत तालुक्यातील कशेळे हद्दीत एका फार्महाऊसवर छापा टाकून शेळी व श्वानपालनाच्या नावाखाली ड्रग्जची निर्मिती उघड केली. या प्रकरणी सहा जणांना अटक करून २५ कोटींचे ड्रग्ज व साहित्य जप्त करण्यात आले आहे.





कर्जत तालुक्यातील कशेळेजवळील दुर्गम भागात वसलेल्या किकवी गावात सावली फार्महाऊसमध्ये एमडी नामक ड्रग्ज बनविण्याच्या कारखान्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तेथे टाकलेल्या छाप्यात एका खोलीत एमडी बनविण्याचा कारखाना थाटला गेल्याचे दिसून आले. या ठिकाणी पाच किलो ५२५ ग्रॅम तयार असलेली एमडी पावडर तसेच हे ड्रग्स बनविण्यासाठी लागणारा कच्चा माल व इलेक्ट्रिक प्लँटचे साहित्य मिळून आले. तेथून १२ कोटी पाच हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून एकाला अटक करण्यात आली.

शेळी व श्वानपालन करायचे असल्याचे सांगून त्यासाठी भाडेतत्वावर फार्महाऊस हा घेण्यात आला, मात्र प्रत्यक्षात ड्रग्जचा कारखाना थाटला होता. तेथील एका खोलीमध्ये शेळी व श्वानांना द्यायचे व्हॅक्सिन ठेवले असल्याचे सांगून या ठिकाणी जाण्यास बाहेरील व्यक्तीला बंदी घालण्यात आली होती.

मुसळधार पाऊस पडत असताना मुंबई पोलिसांची फार्महाऊसवर तीन दिवस कारवाई सुरू होती. या गुन्ह्यात आतापर्यंत २५ कोटी रुपयांचा एकूण १२ किलो ६६४ ग्रॅम वजनाची एमडी पावडर व अमली पदार्थाच्या निर्मितीकरिता लागणारा कच्चा माल, इलेक्ट्रॉनिक प्लँटचे साहित्य जप्त करण्यात आले.

या प्रकरणी ड्रग्ज विक्री करणारे पाच जण आणि उत्पादन करणाऱ्या टोळीतील एक अशा एकूण सहा आरोपींना पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास सुरू आहे. त्यामुळे आणखी काहींच्या अटकेची शक्यता आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त 'कोमसाप'तर्फे साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने एक कृतार्थ संध्याकाळ या साहित्यिक कार्यक्रमांतर्गत कविसंमेलन, परिसंवाद, सन्मान पुरस्कार आणि अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन १ जून रोजी करण्यात आले आहे.

### *कविसंमेलन, परिसंवाद, सन्मान पुरस्कार आणि अभीष्टचिंतन सोहळा*



पनवेल शहरातील विरूपाक्ष मंगल कार्यालयाच्या सभागृहात होणाऱ्या या साहित्यिक कार्यक्रमांमध्ये दुपारी २ वाजता कविसंमेलन होणार आहे. या कविसंमेलनासाठी कवी, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक रामदास फुटाणे, सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर, सुप्रसिद्ध साहित्यिक अरूण म्हात्रे, कोकण मराठी साहित्य परिषदेचे संपर्क प्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ४ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर एक बहुआयामी व्यक्तिमत्व... या विषयावर परिसंवाद होणार आहे. या परिसंवादात पनवेलमधील सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे, सुप्रसिद्ध साहित्यिक अरुण म्हात्रे, संपादक शैलेश शिर्के, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर सहभागी होणार आहेत. **(पान २ वर..)**

### वैष्णवी हगवणे मृत्यूप्रकरणी आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ

**पुणे : प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्येप्रकरणी बुधवारी (दि. २८) पुणे न्यायालयात सुनावणी झाली. या वेळी पाचही आरोपींची पोलीस कोठडी वाढवण्यात आली.

आरोपी नवरा शशांक, आई लता आणि नणंद करिश्माच्या पोलीस कोठडीत एक दिवसाची वाढ करण्यात आली असून सासरे राजेंद्र आणि दीर सुशील यांची पोलीस कोठडी ३१ मेपर्यंत वाढवण्यात आली आहे.

## निवडक

### पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या सीआरपीएफ जवानाला अटक

**नवी दिल्ली :** भारत-पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्षानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) आणखी एका हेराला अटक केली असून तो सीआरपीएफचा अधिकारी आहे. आरोपीचे नाव मोती राम जाट व तो २०२३पासून पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याला माहिती पुरवत होता. त्याची चौकशी सुरू आहे.

### आयपीएलमध्ये आजपासून प्ले ऑफच्या लढती रंगणार

**मुंबई :** आयपीएलमध्ये आता प्लेऑफच्या लढती सुरू होणार आहेत. पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हे संघ क्वालिफायर-१मध्ये गुरुवारी (दि. २९) भिडतील. मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्समध्ये ३० मे रोजी एलिमिनेटरचा सामना खेळला जाईल. हा सामना जिंकणारा संघ क्वालिफायर-२मध्ये पोहचेल, तर पराभूत संघ स्पर्धेतून बाहेर पडेल. क्वालिफायर-२ सामना १ जून रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवण्यात येईल. यामध्ये क्वालिफायर-१मधील पराभूत संघ आणि एलिमिनेटरमधील विजेत्या संघामध्ये लढत होईल. यातून ३ जूनच्या अंतिम सामन्याचे चित्र स्पष्ट होईल.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती पनवेल परिसरात बुधवारी (दि. २८) साजरी झाली. यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहरातील सावरकर चौकात स्वातंत्र्यवीरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचे स्मरण केले. अभिवादनावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, गणेश कडू, सुनील बहिरा, दादा भोईर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, डॉ. सुरेखा मोहकर, सुनंदा पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, भाजप सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, भाजप पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, चिटणीस प्रशांत शेटये, उपाध्यक्ष केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रवीण मोरबाळे, पत्रकार संजय कदम, ॲड. मनोज म्हात्रे, केशवस्मृती पतपेढीचे महेंद्र गोडबोले, वरिष्ठ व्यवस्थापक विनिता जोशी, सुशांत पाटणकर, तेजस वाडकर, ज्योती देशमाने, स्वाती कोळी, अंजली इनामदार, ओबीसी सेल महिला तालुका अध्यक्ष कविता पाटील, ज्योस्त्ना माळी यांच्यासह नागरिक उपस्थित होते. सर्वांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.

# पनवेलमध्ये ३७ लाखांचा गांजा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील पाले खुर्द गावामध्ये पोलिसांनी धाड टाकून जवळपास ३७ लाख रुपये किमतीचा गांजा जप्त केला आहे. तेथे एक महिला टपरीआडून गांजाविक्रीचा व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले.



अमली पदार्थ विक्रेत्यांविरोधात नवी मुंबई पोलिसांनी ऑपरेशन प्रहार अंतर्गत मोहीम उघडली असून या मोहिमेमध्ये एकाच दिवशी ४८ वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या. यात पाले खुर्द या गावात टपरीवजा घरात कारवाई करण्यात आली.

मागील अनेक वर्षांपासून पाले खुर्द गावात भाड्याने राहणारी ५० वर्षीय सरीफुन्नीशा अब्दुलजलील खान ही महिला टपरीआडून गांजाचा व्यवसाय चालवते. तिचे मूळ गाव उत्तर प्रदेशातील असून तिला २५ ते ३० वयाची दोन मुले यामध्ये मदत करतात.

पोलीस पथकाने अचानक धाड मारल्यावर सरीफुन्नीशा हिच्याकडे सुरुवातीला खाटेवरील चादरीखाली पाच किलो वजनाचा गांजा सापडला. तिने हा गांजा मुंब्रा येथून आणल्याचे सांगितले तसेच पोलिसांना एका प्लास्टिक ड्रमच्या खाली खड्डा दिसला. या खड्ड्याखाली असलेला ड्रम बाहेर काढल्यावर त्यात १३ किलो १६४ ग्रॅम वजनाच्या गांजाचा साठा लपवलेला मिळाला. पोलिसांनी एकूण ३७ लाखांचा गांजा जप्त केला असून या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# नवी मुंबई विमानतळावरून पहिल्याच दिवशी १५ शहरात विमाने झेपावणार

**मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई विमानतळावरील उड्डाणासंदर्भात इंडिगो आणि अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड यांच्यात पहिला करार झाला आहे. विमानतळ उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी एकाचवेळी १५ शहरात विमाने झेपवणार आहेत.

### इंडिगो आणि अदानी कंपनी यांच्यात करार

मुंबई विमानतळावर प्रवाशांचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे मुंबई विमानतळाला पर्याय म्हणून नवी मुंबई विमानतळ उभारण्यात येत आहे. ११६० हेक्टर परिसरात उभारण्यात येत आहे. या विमानतळाचा रनवे ३.७ किमी इतका लांब असून या विमातळावर एकाचवेळी ३५० विमाने उभी राहू शकतात. हे विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित झाल्यानंतर वर्षाला नऊ कोटींहून अधिक प्रवासी प्रवास करू शकतात.

नवी मुंबई विमानतळ लवकरच कार्यान्वित होणार असल्याची माहिती या करारानंतर देण्यात आली. या विमानतळावरून पहिल्या दिवसापासून १५पेक्षा जास्त शहरांमध्ये १८ दैनंदिन उड्डाणे (३६ एअर ट्राफिक मॅनेजमेंट) सुरू केले जाणार आहे.

नोव्हेंबर २०२५पर्यंत ७९ दैनंदिन उड्डाणे (१५८ एटीएम) केले जाणार असून यामध्ये १४ आंतरराष्ट्रीय उड्डाणांचा समावेश असेल. येत्या काळात आणखी काही विमान कंपन्यांसोबत नवी मुंबई विमानतळासंदर्भात करार होणार आहे.

ऑक्टोबर २०२५पर्यंत मुंबई विमानतळावरुन १५०पेक्षा जास्त उड्डाणे नवी मुंबई विमानतळावर स्थलांतरित केली जाणार आहे. विमानतळाला चांगली कनेक्टीव्हिटी मिळावी यासाठी परिसरातील इतर मार्गांना विमानतळासोबत जोडले जाणार आहे. त्या दृष्टीने काम सुरू आहे. लवकरच हे विमानतळ उड्डाणासाठी पूर्णपणे सज्ज होईल.




## कीर्तन महोत्सवाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात





**पनवेल :** सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य आणि दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा येत्या २ जून रोजी ७४वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहेत. त्या अनुषंगाने ३१ मे ते २ जूनपर्यंत खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर तीन दिवस कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आली असून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, अतुल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी पाहणी करून आढावा घेण्यात आला. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रल्हाद केणी, राजेंद्र पाटील, मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, दिनेश खानावकर, विकास घरत, दशरथ म्हात्रे, मंगेश वाकडीकर यांच्यासह वारकरी संप्रदायातील मंडळी, पदाधिकारी उपस्थित होते.

# सुरक्षित प्रवासासाठी आता स्मार्ट बसेस

## ◆ एआय तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणालीचा होणार वापर

**मुंबई, :प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या बस मधून प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्यासाठी 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित सुरक्षा प्रणाली स्मार्ट बसेस मध्ये लावण्यात येणार असल्याने या नवीन बसेस प्रवासासाठी अधिक सुरक्षित असतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.







एसटी महामंडळाच्या ठाणे-नागपूर दरम्यान चालवण्यात येणाऱ्या 'स्मार्ट बस'मध्ये बसवण्यात आलेल्या आयटी सुरक्षा प्रणालीची पाहणी उपमुख्यमंत्र्यांनी आज ठाणे येथे केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सध्या दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांना दळणवळण सेवा देणाऱ्या एसटी बसमधील प्रवास अधिकाधिक सुरक्षित झाला पाहिजे. या उद्देशाने एआय तंत्रज्ञानावर आधारित एकात्मिक सुरक्षा प्रणाली नव्या बसेसमध्ये लावण्यात येणार आहे. चालकाच्या बस चालवण्याच्या पद्धती पासून बसमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या हालचालीवर देखरेख करणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्या सोबतच वायफाय, एलईडी स्क्रीन, जीपीएस प्रणाली सह फोम बेस आग प्रतिबंधक प्रणाली देखील बसविण्यात येणार आहे.

या उपकरणामुळे महिलांना सुरक्षितरीत्या प्रवास करता येणे शक्य होणार असून, चालकाला गाडी चालवणे अधिक सोपे होणार आहे. तसेच त्याने मद्यपान केले असले किंवा त्याला झोप येत असली तरीही सायरनद्वारे लगेच कळणार असल्याने प्रवाशांना सुरक्षितरीत्या प्रवास करता येणे शक्य होणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

परिवहन मंत्री सरनाईक यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे ही प्रणाली बसविण्यात येत आहे. त्यांनी भविष्यातील बदलांचा विचार करून एसटीमध्ये अमुलाग्र बदल करण्याचा ध्यास घेतला आहे, असे कौतुकोद्गार उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काढले.


परिवहन महामंडळाच्या या 'स्मार्ट बस'मध्ये प्रगत चालक सहाय्यक प्रणाली (ADAS) आणि चालक निरीक्षण कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तसेच ३६० अंशातील सर्व माहिती चालकाला देणारे ब्लाइंड स्पॉट कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

याशिवाय प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी बसमध्ये प्रवासी भागात दोन, समोर आणि पाठीमागे प्रत्येकी एक कॅमेरा बसवण्यात आला आहे. तसेच चालक सहाय्यक स्क्रीन, मोबाईल जीपीएस ट्रॅकिंग प्रणाली, एलसीडी स्क्रीन आणि सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

## पावसाचा ब्रेक: चार दिवसांनी झाले सूर्यदर्शन

**कर्जत :** गेल्या आठ मे पासून पावसाने सुरुवात केली. संपूर्ण तालुक्याला पावसाने झोडपले. जनजीवन विस्कळीत झाले. मात्र काल संध्याकाळी पावसाने विश्रांती घेलली. आज सकाळी सुद्धा पाऊस नव्हता. त्यामुळे चार दिवसांनंतर सूर्य दर्शन झाले.

कर्जत तालुक्याला गेल्या तीन दिवसांपासून पावसाने अक्षरशः झोडपले आहे. विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाटासह दोन दिवस संततधार पडत असलेल्या पावसाने सर्वांचीच दैना उडवली. कर्जत शहराच्या शेजारून वाहणारी उल्हास नदी दुथडी भरून वाहू लागली. नदीचे पाणी केंव्हाही उलटून शहरात येईल. या भीतीने कर्जतकर रात्रभर जागेच राहिले. काल कोरडी ठाक असलेली उल्हास नदी आज पहाटे पासून कठोकाठ भरून वाहू लागली. मात्र काल पासून पावसाने विश्रांती घेतली. त्यामुळे आज सकाळी साडे दहाच्या सुमारास सूर्य दर्शन झाले. त्यानंतर सायंकाळच्या सुमारास पुन्हा पावसाची रीप रीप सुरु झाली.



# मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी येथील भुयारात पडले दगड; धोका कायम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील जुन्या कशेडी घाटातील रस्त्याला भेगा पडून त्यातून नवीन मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर दरडी कोसळण्याचा धोका निर्माण झाला असताना मंगळवारी सायंकाळी खेड हद्दीमध्ये भुयारी मार्गावर चार-सहा मोठमोठे दगड पडून भूस्खलनाचा धोका स्पष्ट झाला आहे.

पोलादपूर तालुक्यातील कोंढवी फाटयाच्या पुढे काही अंतरावर जुन्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वरून कातळी बंगल्याकडे जाताना जुन्या रस्त्याच्या डाव्या बाजूला रस्त्याचा मोठा भाग भेगा पडल्याने भुस्खलन होऊन नवीन मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कोसळण्याची चिन्हे दिसून येत आहेत. या संभाव्य धोक्याच्या ठिकाणी तशा सूचना देणाऱ्या पताका लावण्यात येऊन या भेगाग्रस्त रस्त्यावरून वाहने नेण्यापासून परावृत्त केले जात आहे.

यंदाच्या पावसात याठिकाणी भूस्खलन होण्याचा धोका कायम असताना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास कातळी भोगावच्या हद्दीतील भुयारी मार्ग संपल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुका हद्दीमध्ये भुयारी मार्गावर चार-सहा मोठमोठे दगड पडल्याची माहिती मदत ग्रुपचे प्रसाद गांधी यांनी कळविली.


यामुळे नवीन मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर अचानकपणे भूस्खलनाचा नवीन धोका निर्माण झाला असला तरी जुन्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वरील रस्ता खचून तो नवीन मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कोसळण्याचा धोकादेखील कायम असल्याने भेगा पडलेल्या रस्त्याच्याबाजूने नवीन रस्त्यालगत संरक्षक भिंत बांधण्याचे काम हाती घेण्यात येणार नसल्यास नवीन महामार्ग बंद होऊ नये यासाठी भेगा पडलेल्या जुन्या महामार्गावरील जुना रस्ता सुरक्षितपणे फोडण्याचे काम तातडीने घेण्याची गरज असल्याचे स्पष्ट असताना कोणतीही कृती केली जात नसल्याने धोका कायमच राहणार आहे.



# माथेरान पर्यटनस्थळी पावसाची उसंत

**माथेरान : बातमीदार**

रविवारी पहाटे पासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने आता कुठे विश्रांती घेतली आहे.जवळपास



दोन दिवसांत ३०३ मिमी पावसाची नोंद याठिकाणी करण्यात आली आहे.येथील पहिल्याच पावसाने या ठिकाणी वीजपुरवठा खंडित करून सर्व नेटवर्क पूर्ण पणे बंद केले.बँकेतील कामकाज आणि एटीएम पण बंद झाले होते याचा मोठा फटका माथेरानच्या पर्यटन व्यवसायाला बसला.

सोमवार २६ मे पहाटे पासून ढगांचा गडगडाट व विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने हजेरी लावली.पहाटेच्या वेळी पावसाचा जोर आणि सर्वत्र अंधार असल्याने कोणीही घराबाहेर नव्हते.तब्बल तीन ते साडेतीन तासात १८१ मिलिमीटर इतका पाऊस या ठिकाणी कोसळला.त्यानंतर सोम.सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत १२२ मिमी पावसाची नोंद झाली.एकूणच ३०३ मिमी पाऊस बरसला.माथेरान पर्यटनस्थळी या ठिकाणी उन्हाळी पर्यटनासाठी मे महिना हा फारच महत्वाचा असतो.या महिन्यातच मुख्यतः माथेरान पर्यटन बहरते.

यावर्षी मे महिन्यात याठिकाणी पर्यटकांकडून कमी प्रतिसाद मिळाला होता.२० मे नंतर पर्यटन हळूहळू वाढू लागले होते.मे महिन्यातील चौथ्या विकेंडला पर्यटक मोठ्या प्रमाणावर माथेरान मध्ये दाखल झाले होते.जवळपास हजारोंच्या संख्येने पर्यटक शहरात असताना सोमवार २६ मे रोजी पहाटे मुसळधार पावसाला सुरुवात झाली. पहाटे पासूनच वीज पुरवठा खंडित करण्यात आला.त्यामुळे येथील सगळेच नेटवर्क काही तासात बंद झाले.बँक व्यवहार एटीएम सुविधा बंद झाल्याने पर्यटकांची मात्र आर्थिक कोंडी झाली.नाईलाजास्तव बहुतांश पर्यटकांनी माथेरान सोडणे पसंत केले.त्यामुळे ऐन मोक्याच्या वेळी माथेरानमधील पर्यटन व्यवसायाला ब्रेक लागला. जुलै मध्ये बरसणारा पाऊस मे मध्ये बसरल्याने २६ आणि २७ मे रोजी सकाळी साडे आठपर्यंत दोन दिवसांत ३०३ मिलिमीटर पाऊस कोसळला.मे मध्ये एवढा पाऊस होण्याची ही पहिलीच वेळ आहे.१९९० मध्ये मे महिन्यात पाऊस झाला होता.मात्र त्यावेळी पावसाचे प्रमाण कमी होते. तुफानी पावसामुळे सुरक्षेच्या कारणास्तव नेरळ-माथेरान-नेरळ मिनिटेन दोन दिवस बंद ठेवण्यात आली.वॉटर पाईप स्टेशनच्या वरील बाजूस दोन ते तीन ठिकाणी दरड कोसळली असून ते काढण्याचे काम चालू असून ते आटोपल्यावर मिनीट्रेन सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच अमनलॉज-माथेरान ही शटल सेवा नियोजित वेळेनुसार धावत आहे.

माथेरानमध्ये २६ मे रोजी तीन तासांत तब्बल १८१ मिलिमीटर पाऊस कोसळला. त्यामुळे सर्वांना २६ जुलै २००५ ची आठवण झाली. सुदैवाने कमी वेळेत २६ जुलैसारखा पाऊस होऊन देखील कोणतीही जीवित किंव्हा वित्तहानी झालेली नाही. तसेच आता कुठे पावसाने थोडी उसंत घेतली असून सध्या माथेरान मधील सर्व व्यवहार सुरळीत सुरू आहेत.

## खोपोलीत दरडप्रवण क्षेत्रात आपत्ती व्यवस्थापनाचे मॉक ड्रिल

**खोपोली, खालापूर, चौक : प्रतिनिधी**

रायगडचे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्रधिकरण रायगड अलिबाग किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर तालुक्यातील तहसीलदार अभय चव्हाण यांच्या आदेशान्वये खोपोली शहरातल्या सुभाष नगर भागातील दरड प्रवण क्षेत्रात दिनांक २८ मे रोजी मॉकड्रिल आयोजित करण्यात आले होते. रायगड जिल्हा आपदा मित्र यंत्रणेचे नोडल ऑफिसर एम. के. म्हात्रे यांनी दुपारी ३.०५ वा. अलर्ट कॉल दिल्यावर अवघ्या पाचच मिनिटांत एका मागोमाग एक अशा सर्वच यंत्रणाचे अधिकारी, कर्मचारी आणि जवान आवश्यक संसाधनासह सुभाष नगर परिसरात दाखल झाले.

एकीकडे मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा सुरू असताना अचानक दाखल झालेल्या सर्व यंत्रणांना पाहून तेथील नागरिक हवालदिल झाले होते. त्यावेळी आपत्कालीन यंत्रणांच्या सज्ञतेची चाचणी घेण्यासाठी या मॉकड्रीलचे आयोजन केल्याचे नोडल ऑफिसर एम के मात्रे यांनी स्पष्ट केले आणि आपत्कालीन प्रसंगी नागरिकांना सुरक्षेच्या संदर्भात योग्य त्या सूचना दिल्या.

खालापूर तालुका तहसीलदार कार्यालयाकडून महसूल यंत्रणेचे अधिकारी मनोज पवार, खोपोली नगरपालिका प्रशासनाचे उप मुख्याधिकारी रणजीत पवार आणि सर्व खात्यांचे प्रमुख, खोपोली पोलिस स्टेशनचे निरीक्षक शितल राऊत आणि अधिकारी, खोपोली नगर पालिका अग्निशमन दलाचे मोहन मोरे आणि जवान, खोपोली नगरपालिका डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी डॉ. संगीता वानखेडे आणि आशा वर्कर, सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी, म.रा.वि.मचे अधिकारी आणि कर्मचारी, वन खात्याचे अधिकारी, मंडळ अधिकारी भरत सावंत, सामाजिक संस्थेचे सदस्य त्याच प्रमाणे अन्य संस्थांनी तत्परतेने मॉकड्रीलमधे सहभाग घेऊन आपले कर्तव्य बजावले.



पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त 'कोमसाप'तर्फे साहित्यिक कार्यक्रमांची रेलचेल

सायंकाळी ५ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन सोहळा होणार आहे या सोहळ्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, कवी, चित्रपट निर्माते, दिग्दर्शक रामदास फुटाणे, आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत, सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर, कोकण मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष नमिता कीर, कार्याध्यक्ष व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, सुप्रसिद्ध साहित्यिक अरुण म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कोकण मराठी साहित्य परिषदेचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील, कोमसाप रायगडचे अध्यक्ष सुधीर शेठ उपस्थित राहणार आहेत.

या सोहळ्यात पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती व संस्थांना सन्मान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या साहित्यिक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी केले आहे.

## वळगणीच्या माशांवर खवय्यांचा ताव; आदिवासींना उपलब्ध होतोय रोजगार

अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात झाल्यामुळे वळगणीच्या माशांसाठी खवय्यांची धडपड सुरू झाली आहे. आदिवासी बांधवांकडून येथील नदीपात्रात दिवस-रात्र जाळे टाकून मासे पकडले जात आहेत. तसेच शेतामध्ये नदीचे पाणी शिरल्याने विविध पद्धतीने वळगणीचे मासे पकडून त्याच्यावर ताव मारला जात आहे. या वळगणीच्या माशांना मोठी मागणी असते. त्यामुळे या माशांची चांगली विक्री होऊन आदिवासी बांधवांच्या हातात चांगले पैसे येतात.



यावर्षी मे महिन्यातच रायगडकरांना पावसाने झोडपले आहे. त्यामुळे नद्या, नाले वाहू लागले आहेत. नद्या, नाले वाहू लागले की, कोकणातील गावाखेड्यांसह सर्वांनाच आकर्षण असते ते म्हणजे वळगणीच्या माशांचे. नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने हे मासे शेतात, नाल्यात, ओहळात अंडी सोडण्यासाठी मोठ्या संख्येने प्रवेश करतात. याना वळगणीचे किंवा चढणीचे मासे असंही म्हणतात. त्यामुळे यंदादेखील जोरदार पाऊस सुरू झाल्यानंतर येथील नदीतील मासे ओहळात, शेतात शिरले आहेत. पावसाच्या आगमनाने वळगणीसाठी खवय्ये सज्ज झालेले पाहायला मिळतात. त्यामुळे आदिवासी बांधवांकडून हे मासे जाळ्यात पकडले जाता ग्रामीण भागातील तरूणही नदीवर मासे पकडण्यासाठी जात असतात.

यंदा पाऊस लवकर दाखल झाल्याने समुद्रातील मासेमारी जवळपास बंद झाली आहे. जी काही मासळी उपलब्ध असते ती अव्वाच्या सव्वा भावाने विकली जाते. त्यामुळे अतिशय चवदार आणि विशिष्ट हंगामातच मिळणारया या वळगणीच्या माशांना अधिक मागणी असल्याचे दिसून येते.

नदीच्या गोड्या पाण्यातील अतिशय चवदार, लज्ञतदार म्हणजे मळ्याचे मासे होय. रायगडमध्ये खवय्यांची पहिली पसंत म्हणजे मळ्याचे मासे गाभोळी असलेले हे मासे देखील फारच चविष्ट असतात.

## दुखवटा

### अनुसया कदम



**चौक :** अनुसया विठ्ठलराव कदम यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी दुखःद निधन झाले. ताई या नावाने सुपरिचित असलेल्या व देवावर नितांत श्रद्धा असलेल्या त्या वारकरी पंथात सक्रीय होत्या. त्यांच्या मागे तीन विवाहित मुलगे, दोन विवाहित मुली असून मोठा परिवार आहे.

### सुधीर कडवे



**अलिबाग :** मिळखतखार- सारळ येथील सुधीर नारायण कडवे यांचे रविवारी (दि. २५) अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ४४ वर्षांचे होते.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.त्यांचे उत्तरकार्य ५ जून रोजी राहत्या घरी सारळ येथे होणार आहेत.

# १६ गावे पाण्याखाली जाण्याची भीती

## ◆ उरणमधील नालेसफाई न झाल्याने धोका

**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए, सिडकोच्या दुर्लक्षपणामुळे अद्यापही अनेक ठिकाणी मान्सूनपुर्वी नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली नसल्याने उरण परिसरातील सुमारे १६ गावे पावसाळ्यात पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

जेएनपीटीच्या हद्दीत जसखार, सोनारी, सावरखार, करळ, नवीन शेवा, हनुमान कोळीवाडा ही गावे येतात. या गावांतील गावाबाहेर असलेल्या छोट्या मोठ्या नाले व गटारांची सफाईची कामेही जेएनपीएमार्फत केली जातात, मात्र मान्सूनपुर्व कामात हलगर्जीपणा होत असल्याने मात्र दरवर्षी जसखार, सोनारी, सावरखार, करळ, नवीन शेवा आदी गावे एकाच वेळी आलेली समुद्राची उधाणाची भरती व पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे गावात पाणी शिरते.

त्याशिवाय रेल्वेच्या मागील तीन वर्षांपासून सुरू जसखार गावाबाहेर असलेल्या मोठ्या नाला असलेल्या माती भरावाच्या कामामुळे गावा सभोवताली असलेले नाले बुजून गेले आहेत. परिणामी सुमारे ७५० घरे असलेल्या जसखार गावातील निम्मे घरे दरवर्षी पाण्याखाली बुडतात. उरण तालुक्यातील बोकडवीरा, फुंडे, चाणजे, म्हातवली, नागाव, नवघर, भेंडखळ, पागोटे आदी ग्रामपंचायतीमधील नालेसफाईची कामे सिडकोच्या सहकार्याने केली जातात. गावातील अंतर्गत गटारे, नालेसफाईची कामे ग्रामपंचायत करते.



गावाबाहेरील नाले, गटाराच्या सफाईची कामे सिडकोमार्फत केली जातात, मात्र अद्यापही सिडकोच्या अखत्यारीत गावातील मान्सूनपुर्व नालेसफाईची कामे अद्यापही कागदावरच आहेत. अनेक गावातील नाले सफाईच्या कामांची टेंडरही काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नालेसफाईच्या कामांना काही ग्रामपंचायत हद्दीतील गावात सुरुवातच झालेली नसल्याने बोकडवीरा, चाणजे, म्हातवली, नागाव, नवघर, भेंडखळ, पागोटे आदी गावांतील गावकऱ्यांना यावर्षीही पुराचे पाण्याचा सामना करावा लागणार आहे. पागोटे ग्रामपंचायत हद्दीतील कुंडेगाव, पागोटे, नवघर, भेंडखळ ही गावे दरवर्षी पाण्याखाली जातात. योग्य प्रकारे नालेसफाईची कामे केली जात नसल्यानेच दरवर्षी पाण्याखाली जात असल्याची खंत ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

### *संबंधितांना आदेश दिलेत -तहसीलदार*

*एकाही गावात पाणी साचणार नाही, समुद्र, खाड्या किनाऱ्यावरील एकाही गावात पाऊस, समुद्राचे पाणी शिरणार नाही याची दक्षता घेण्याची सक्तीचे आदेश सिडको, जेएनपीए, ग्रामपंचायतींना आढावा बैठकीतच देण्यात आले असल्याची माहिती उरण तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी दिली.*

मागील तीन-चार वर्षांपासून चिरनेर गावाची पुरग्रस्त म्हणून ओळख बनली आहे, मात्र मागील वर्षी मुख्य नाल्यांची मोठ्या व्यासाचे पाईप टाकून दुरुस्ती केली आहे. मात्र नाल्यावरील संरक्षक भिंतींची उंची वाढविण्यात आली असल्याने यावर्षी पाणी तुंबुन गावात शिरण्याची भीती गावकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. संरक्षण भिंतींना खाचे मारल्याने पावसाचे पाणी गावात शिरण्याची शक्यता कमी असल्याचे चिरनेर सरपंच भास्कर मोकल यांनी वर्तविली आहे.

केगाव हद्दीतील नौदलाच्या डोंगरातून येणारे पावसाचे पाणी या वर्षीही गावातील घरात शिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रानसई धरणाच्या खालच्या बाजूला असलेल्या विंधणे, दिघोडे, ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य नाले अद्यापही नालेसफाईच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गावांनाही पावसाळ्यात पुराचा धोका संभवतो आहे. उरण शहरातही नालेसफाईची कामे अद्यापही पुर्णत्वास गेलेली नाहीत. त्यामुळे शहरातील सखल भागात दरवर्षीप्रमाणे पाणी तुंबण्याची भीती व्यक्त केली जात आहे, मात्र नालेसफाईची ८५ टक्के कामे पूर्ण झाली असल्याचा दावा उनपचे रचनाकार निखिल ढोरे यांनी माहिती देताना व्यक्त केला आहे.



पनवेल : भाजपच्या वतीने मध्यवर्ती कार्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव तसेच महेश पाटील, प्रशांत गांगर्डे, अनंता मुकादम, धनंजय कुठले, अनंत मुकादम, केतन मुकादम आदी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.




पनवेल : भाजप नेते प्रितम म्हात्रे यांच्या जनसंपर्क कार्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू, सुनील बहिरा, विजय भोईर, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, डॉ. सुरेखा मोहोकर, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, युवा नेते मंगेश अपराज, डॉ. विलास मोहोकर, जॉनी जॉर्ज आदी उपस्थित होते.



पनवेल : प्रभाग क्रमांक १९मधील धोकादायक झालेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात आली आहे. या कामी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी पाठपुरावा केला. छाटणीदरम्यान व पाहणीवेळी त्यांच्यासमवेत साहेबराव घुमरे, सुमित शिंदे, राकेश मुरकुटे, कविता पाटील आदी उपस्थित होते.

# पनवेल महापालिका मुख्यालयात अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात बुधवारी (दि.२८) महान क्रांतीकारक स्वांतत्र्यवीर सावरकर यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे ,परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, सचिव अक्षय कदम, आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# ए.सी. पाटील कॉलेजच्या पहिल्या मजल्यावर आग

**पनवेल : वार्ताहर**

खारघर शहरातील ए.सी पाटील कॉलेज ऑफ इंजिनिरिंगच्या पहिल्या मजल्यावर लागलेल्या आगीत प्रचंड नुकसान झाले आहे.

सायन पनवेल हायवे रोड खारघर सेक्टर ४ प्लॉट नंबर १७ एसी पाटील कॉलेज ऑफ इंजिनिरिंग येथे कॉलेजच्या पहिल्या माळ्यावर असलेल्या प्रशासकीय कार्यालयात आणि प्रिन्सिपल ऑफिस मध्ये आग लागली होती. याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहचले व त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग विझवली.

या आगीत प्रशासकीय कार्यालय आणि मुख्याध्यापक कार्यालयाचे मोठे नुकसान झाले असून आगीत दोन टीव्ही, दोन एसी, दोन कम्प्युटर, सिलिंग स्लाईडिंग ग्लास, दोन फॅन टेबल खुर्च्या हे मोठ्या प्रमाणात जळून नुकसान झाले आहे.

# उरण ते केरळदरम्यान प्रवासात कार पेटली



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील बोरी पाखाडी हुसेन मंजिल येथे राहणारे कुट्टी कुटुंब उरण ते कन्नूर केरळ असा प्रवास करताना त्यांच्या कारने अचानक पेट घेतला. या वेळी सर्वांनी कार बाहेर मारल्या उड्या मारल्या. त्यामुळे उरणमधील कुट्टी परिवारातील सदस्य बाल बाल बचावले.

बोरी पाखाडी हुसेन मंजिल येथे राहणारे इकबाल अहेमद कुट्टी, रुबीना इकबाल कुट्टी (पत्नी), नोफ एकबाल कुट्टी (मुलगी), अजीझा इकबाल कुट्टी (मुलगी ), उमर इकबाल कुट्टी (मुलगा) हे सर्वजण एका कुटुंबातील सदस्य २१ मे रोजी रात्री प्रवास सुरू केला. त्यांनी रत्नागिरी गोवा मंगलोर असे फिरता प्रवास केला होता. शुक्रवार २३ मे २०२५ रोजी मारुती एर्टिगा (एमएच ४६ सीव्ही ६५५७) या कारने प्रवास करत असताना कासरगोड चरकाला या ठिकाणी सकाळी ५:३० वाजता कारमधून अचानक धूर येऊ लागला.

रुबीना इकबाल कुट्टी या कार चालवत होत्या. धूर येऊ लागल्याने रुबीना इकबाल कुट्टी यांनी कार अचानक बाजूला पार्किंग केली. कारमधून अचानक सर्वजण बाहेर पडले. सुरक्षित ठिकाणी एका बाजूला सर्वजण उभे राहिले. यामुळे सर्वांचे प्राण वाचले. या घटनेत कारला आग लागून कारचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. गाडीला आग लागल्यामुळे गाडीचे मोठे नुकसान झाले असल्यामुळे सदर घटने बाबत इकबाल अहेमद कुट्टी व त्यांच्या परिवाराने कासारगोडे जिल्ह्यातील विद्यानगर येथील पोलीस ठाण्यात माहिती दिली.

माहिती मिळताच पोलीस प्रशासनाने एफआयआर नोंदवून घेतला आहे. या वाहनाला आग लागल्याची घटना कशामुळे घडली? आग कशी लागली याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# तळोजा भुयारी मार्गात साचतेय पाणी

## ◆ मुसळधार पावसात बिकट स्थिती; नागरिक त्रस्त

**पनवेल : वार्ताहर**

५० कोटी रुपये खर्च करून रेल्वे आणि सिडकोने दिवा-पनवेल रेल्वे मार्गावर उभारलेल्या तळोजा भुयारी मार्गातील पाणी निचरा करण्यास रेल्वे प्रशासनास अपयश आल्यामुळे तळोजावासियांना आजही तीन किलोमीटर अंतर पार करून पेंधर रेल्वे फाटक मार्गावरुन ये-जा करावी लागत आहे. तळोजा वाहतूक विभागाने रेल्वे प्रशासनाकडे भुयारी मार्गाविषयी लेखी पत्रव्यवहार केले आहेत, मात्र दखल घेत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.

२६ मे रोजी सकाळी पडलेल्या मुसळधार पावसामुळे तळोजा भुयारी मार्गात ५ फुटापर्यंत पाणी भरले आहे. त्यामुळे तळोजा वसाहत तसेच परिसरातील १० गावातील दुचाकी आणि चार चाकी वाहन चालकांना पेंधर रेल्वे फाटक मार्गे जावे लागत असल्यामुळे परिसरातील रहिवासी तसेच वाहतूक पोलिसांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे तळोजा आणि नवी मुंबई वाहतूक विभागाने रेल्वे प्रशासनाला भुयारी मार्गातील पाणी निचरा करण्यासाठी प्रयत्न करावे या विषयी लेखी पत्र देऊनही कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली नसल्याचे वाहतूक अधिकाऱ्यांनी सांगितले. २६ मे रोजी सकाळी ९ पासून भुयारी मार्ग बंद आहे. २७ मे रोजी देखील भुयारी मार्गात पाणी जैसे थे असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

या विषयी पनवेल विभाग रेल्वेचे कार्यकारी अभियंता शांतीलाल चौधरी यांच्याशी संपर्क केला असता होऊ शकला नाही. पेंधर रेल्वे फाटकावर कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांशी संपर्क केला असता २६ मे रोजी सकाळी १० पासून दोन दिवसात रेल्वे फाटक मार्गे लाखापेक्षा जास्त वाहनांनी ये-जा केली असेल. विशेष म्हणजे रेल्वे फाटक मार्गे ये-जा करताना पनवेल-मुंब्रा मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये साठी २ दिवसांपासून उभे राहून वाहतूक कोंडी सोडविण्याचे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

> **तळोजा भुयारी मार्ग तुटूंब भरले आहे. रेल्वे प्रशासनास पाणी निचरा करण्याविषयी लेखी पत्र देवूनही उपाययोजना केली नाही. त्यामुळे परिसरातील तळोजा फेज-१ मधील नागरिकांना ३ किलोमीटर अंतर पार करून पेंधर रेल्वे फाटक मार्गे ये-जा करावी लागत आहे.**
>
> **-दिलीप चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तळोजा वाहतूक विभाग**

# भाजपतर्फे अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त भाजप पनवेल तालुका ग्रामीण उत्तर मंडळाच्या वतीने मंगळवारी (दि.२७) भक्तिभावपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तळोजा मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांतर्गत मंदिराची स्वच्छता, गौ शाळेला भेट आणि सामुहिक महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या पवित्र उपक्रमांमध्ये अनेक मान्यवर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी भाजप नेते प्रल्हाद केणी, अंकुश पाटील, विनोद घरत, प्रभाग २चे अध्यक्ष कृष्णाशेठ पाटील, किरण दाभने, नितीन भोईर, भास्कर आगलावे, बाळकृष्ण पाटील, विशाल खानावकर, आशिष कडू, समीर गोंधळी, आकाश फडके, पवन भोईर, शुभम खानावकर, विनीत खानावकर, करण फडके आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.





# नील हॉस्पिटल येथे गर्भसंस्कार कार्यशाळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नील हॉस्पिटल न्यू पनवेल येथे समग्र आरोग्यासाठी प्रेरणा देणारी कार्यशाळा, नील हॉस्पिटल, DSRF आणि विहासा मेडिकल विंग ब्रह्माकुमारीज यांच्या सहकार्याने, रविवार, २५ मे रोजी यशस्वीरित्या आयोजित करण्यात आली.



महाराष्ट्र आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्या हस्ते गर्भसंस्कार कार्यशाळेचे उद्घाटन झाले. डॉ. नितीन अंबाडेकर, वरिष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. अंबाडेकर, प्राध्यापक आयजीजीएमसी नागपूर डॉ. अलका पाटणकर आणि इतर मान्यवरांचे स्वागत व सत्कार बीके डॉ शुभदा नील स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ व राष्ट्रपती पुस्कार प्राप्त मंगला गडमुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

नील हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालक, वरिष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ, डीएसआरएफच्या अध्यक्षा बीके डॉ. शुभदा नील यांनी गर्भवती माता, त्यांच्या कुटुंबातील सदस्य, कर्मचारी परिचारिका आणि आरएमओएस यांच्यासाठी दिव्य व आनंददाई पालकत्व या विषयावर एक संवादात्मक दिव्य गर्भसंस्कार कार्यशाळा आयोजित केली. गर्भवती माता खुश आणि स्वस्थ राहिल्या तर येणारे बाळ खुश व स्वस्थ होईल. जास्तीत जास्ती गर्भवती महिलांनी दर महिन्याला होणाऱ्या या मोफत गर्भसंस्कार शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ शुभदा नील यांनी केले आहे.

दुपारी विहासा टीम पूजा शर्मा, डॉ. उमा ढोले (वरिष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ, नागपूर) आणि डॉ. उल्हास घोटकर यांनी दोन प्रभावी मूल्यांवर आधारित कार्यशाळा आयोजित केल्या, एक गर्भवती माता आणि त्यांच्या कुटुंबांसाठी आणि दुसरी रुग्णालयातील कर्मचारी, परिचारिका आणि आरएमओ यांच्यासाठी. या दिवशी विविध उत्साही सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते ज्यामुळे या कार्यशाळेत आनंद आणि एकता निर्माण झाली.

कार्यक्रमाची सांगता एका उत्साही गरबा सत्राने झाली. त्यानंतर नील हॉस्पिटल येथे नव निर्मित सर्वधर्म प्रार्थना आणि ध्यान स्थळाला भेट देण्यात आली. कार्यशाळेला अत्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला, सहभागींनी वैद्यकीय अंतर्दृष्टी आणि आध्यात्मिक ज्ञानाच्या अद्वितीय मिश्रणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# नाट्यमहोत्सवाला अभूतपूर्व प्रतिसाद; सर्व शो हाऊसफुल्ल!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वर्षाच्या पर्वाला दिमाखदार सुरुवात झाली आहे. त्यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय नाट्यमहोत्सवाला नाट्यरसिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे.

आश्चर्याची बाब म्हणजे, विनामूल्य प्रवेशिका वाटप सुरू होताच केवळ तीन तासांच्या आत महोत्सवातील दोन्ही नाटकांचे सर्व शो हाऊसफुल्ल झाले आहेत. पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवार दिनांक २ जून रोजी सायंकाळी ४ आणि रात्री ८ वाजता विनोदी नाटक एका लग्नाची पुढची गोष्ट सादर होणार आहे, तर मंगळवार दिनांक ३ जून रोजी सायंकाळी ४ आणि रात्री ८ वाजता विनोदी नाटक कुटुंब किर्रतन रंगणार आहे.




या दोन्ही लोकप्रिय नाटकांच्या विनामूल्य प्रवेशिका वाटपाला सुरुवात होताच नाट्यरसिकांनी प्रचंड गर्दी केली आणि अवघ्या तीन तासांत दोन्ही नाटकांचे चारही प्रयोग हाऊसफुल्ल झाले. नाट्यरसिकांच्या या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आयोजकांनी आभार मानले आहेत.

## संपादकीय

# अनिष्ट प्रथांना अटकाव हवा

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण हे वैयक्तिक कौटुंबिक स्वरूपाचे प्रकरण असले तरी त्याभोवतीची चर्चा आता त्या कुटुंबापुरती मर्यादित राहिलेली नाही. या प्रकरणाचे पडसाद अजुनही पुण्यासह राज्यभरात उमटत असून हुंडा प्रथा, कौटुंबिक छळ यांच्याविरोधात चर्चा सुरू झाली आहे. आधुनिक काळात मुली मुलांच्या बरोबरीने शिक्षण घेत असतानाही हे प्रश्न कायम आहेत हे आपल्या समाजासाठी लांछनास्पदच आहे.

**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणातील घडामोडी इतके दिवस उलटून गेले तरी आजही लोकांचे लक्ष वेधून घेत आहेत. एका श्रीमंत कुटुंबात वाढलेली व विवाहानंतर दुसऱ्या श्रीमंत कुटुंबाची सदस्य झालेली वैष्णवीसारखी सुशिक्षित तरुणी कौटुंबिक छळातून आत्महत्येचा पर्याय निवडते याचा धक्का मराठा समाजालाच नव्हे तर राज्यभरातील लोकांना बसला आहे. मराठा समाजाने अशा घटनेस कारणीभूत प्रवृत्तींवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घेतली आहे. अनेक अनिष्ट प्रथांची चर्चाही या प्रकरणानंतर सुरू झाली असून यात आज लग्नाला अफाट खर्चामुळे प्राप्त झालेले निव्वळ सोहळ्याचे स्वरूप यापासून ते हुंडा प्रथा, कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या बाबींचा समावेश आहे. यासंदर्भात पुण्यातील मराठा समाजाच्या काही सदस्यांनी बैठक घेतली व त्यात लग्नकार्यातील अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी आचारसंहिता तयार करण्याविषयी चर्चा झाली. लग्नसोहळे मर्यादित लोकांमध्ये आयोजित केले जावेत, समाजातील मान्यवरांच्या हस्ते सोन्याचे दागिने, गाडीची चावी आदी वस्तू जावयाला देण्याचा आग्रह केला जाऊ नये, बडेजाव करू नये यासाठी समाजात प्रबोधन केले गेले पाहिजे असे या बैठकीत ठरवण्यात आले. लग्नसोहळ्याच्या अफाट खर्चाचे लोण आता मध्यमवर्गीयांपर्यंतही पोहोचले आहे. मराठा समाजच नव्हे तर अनेक समाजांतील सुखवस्तू कुटुंबांकडुन लग्नसोहळ्यांवर वारेमाप खर्च केला जातो व त्याचेच अनुकरण मर्यादित आर्थिक क्षमता असणाऱ्या वर्गातील लोकही वेळप्रसंगी कर्ज काढून करतात. साधेपणाने वा आटोपशीर खर्चाने विवाहसोहळा आयोजित करण्याचा पर्याय सगळ्याच नव्हे तर काही मान्यवरांनी निवडला तरी समाजाला कोणता आदर्श निवडावा याचे मार्गदर्शन होऊ शकते. यादृष्टीने समाजाचे प्रबोधन करण्याकरिता पुणे शहरातील मातब्बर कुटुंबांच्या प्रतिनिधींची एक समिती स्थापन करण्याचा निर्णय तेथील मराठा समाजाने घेतला आहे. इतर समाजांमधील लोकांनीही यादृष्टीने पुढाकार घेऊन उधळपट्टीचे चुकीचे पायंडे रोखण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. यासंदर्भात राज्यात किमान चर्चा सुरू होते आहे हेही नसे थोडके. कोणत्याही मुलीचा छळ समाज सहन करणार नाही. सुनेचा छळ करण्याच्या प्रवृत्तीला पूर्ण विरोध करण्याचेही या समाजाने ठरवले असून अशा कुटुंबांवर बहिष्कार घालण्याचा इशारा दिला आहे. प्रत्येक मुलीला शिक्षित करून तिच्या पायावर उभे केले जाईल. अडचणीच्या काळात समाज पाठिशी उभा राहील असाही ठराव मराठा समाजाने केला आहे. एकदा का मुलगी लग्न करून सासरी गेली की तिथे कितीही त्रास झाला तरी तिने परत माहेरी परतून येऊ नये अशी भूमिका आजही मुलींच्या कुटुंबांची व समाजाचीही असलेली दिसते. परतीचे मार्ग बंद झाल्यामुळेच छळ सोसणाऱ्या विवाहितांना आत्महत्येकडे वळावे लागते हे भीषण वास्तव आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी समाजानेच अशा मुलींना, त्यांच्या कुटुंबांना आधार द्यायला हवा हे खरेच आहे. हे निव्वळ मराठा समाजापुरते नसून अशा परिस्थितीला तोंड देणाऱ्या सर्व विवाहितांना त्यांच्या समाजाकडून आधार मिळायला हवा.**

# आदिवासी सहकारी संस्थांच्या मासेमारी ठेक्यांसाठी कोर्ट आणि खटले



### खबरबात
शैलेश पालकर

महाड तालुक्यातील चार आणि पोलादपूर तालुक्यातील एका आदिवासी-कातकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांच्या मासेमारी ठेक्यांबाबत रायगड जिल्हा मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्तांनी राज्याच्या मत्स्यव्यवसाय आयुक्तांच्या आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांचा मासेमारीचा ठेका एकतर्फी रद्द न करण्याच्या आदेशाविरोधात जाऊन ठेके रद्द करताना केवळ वरिष्ठांच्याच नव्हे तर भारतीय संविधानाच्या तसेच संविधानातील भाग ४ च्या अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्वे आणि निर्देश यांच्या विरोधात जाऊन मनमानी केली आहे.

परिणामी, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांना रायगड जिल्हा मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्तांनी घेतलेल्या अन्याय्य तसेच घटनाबाह्य निर्णयाविरोधात राज्याच्या मत्स्यव्यवसाय आयुक्तांच्या कोर्टात दाद मागावी लागली आहे. राज्याच्या लोककल्याणकारी संकल्पनेस बाधा आणणाऱ्या सहायक मत्स्यव्यवसाय आयुक्तांच्या मनमानीमुळे त्या पदावरील व्यक्तीविरोधात राज्यसरकारने योग्य ती कारवाई करण्याची गरज आहे.

भारतीय राज्यघटनेच्या भाग ४ मध्ये कल्याणकारी राज्य धोरणाच्या मार्गदर्शक तत्वांचा उल्लेख करण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या या भाग चार मधील अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये मार्गदर्शक तत्वे आणि निर्देश यांचा उल्लेख दिसून येत आहे. जे न्यायास उचित आहे आणि जे न्यायालयातून अंमलबजावणी केले जाऊ शकते; या खेरीज देखील ज्या मार्गदर्शक तत्व प्रणालींचा न्यायालयाद्वारे कायद्यांच्या स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येऊ शकत नाही. मात्र मार्गदर्शक तत्व प्रणालींचा लोककल्याणासाठी देशातील राज्य सरकारांना नियम आणि सिध्दांत म्हणून उपयुक्त वापर करता येईल.

भारतीय संविधानाच्या भाग ४ मधील अनुच्छेद ३६ ते ५१ कोणत्याही न्यायालयाद्वारे प्रभावित करता येणार नाही मात्र या मार्गदर्शक तत्व प्रणालींना लागू करण्याचे देशातील राज्य सरकारांचे कर्तव्य राहील.

डायरेक्टीव्ह प्रिन्सिपल्स ऑफ स्टेट पोलिसी म्हणजेच राज्य सरकारच्या लोककल्याणकारी धोरणांना उपयुक्त मार्गदर्शक तत्वप्रणालीच्या अनुच्छेद ४३ बी नुसार सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी भारतीय संविधानाने भाग ४ प्रमाणे राज्य सरकारला मार्गदर्शक तत्व घालून दिले आहे. त्यानुसार अपीलार्थी हे विविध कार्यकारी सहकारी संस्था आहेत. त्यामुळे त्यांचा मासेमारी ठेका रद्द करणे अथवा येत्या पाच वर्षापर्यंत ठेका मंजूर न करणे हे भारतीय संविधानाच्या भाग ४ मधील अनुच्छेद ४३ बी तील मार्गदर्शक तत्व प्रणालीच्या विरोधात मत्स्य व्यवसाय सहाय्यक आयुक्तांनी केलेली कृती आहे.

या कृतीतून मा. सहाय्यक आयुक्त महोदय, मत्स्य व्यवसाय यांनी केवळ मा. आयुक्त महोदय, मत्स्य व्यवसाय यांच्या दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या मच्छीमार विविध कार्यकारी सोसायटीचा मासेमारीचे ठेके एकतर्फी आदेशाने रद्द करण्याचा निर्णय रद्दबातल करण्याच्या आदेशाचे पत्र प्राप्त झाले असताना दिनांक १४.१०.२०२४ रोजी महाड तालुक्यातील ४ आणि पोलादपूर तालुक्यातील १ अशा एकूण ५ आदिवासी बांधवांच्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांच्या आदिवासी सदस्यांच्या पारंपारिक मच्छीमारीच्या उपजीविकेच्या साधनावर गदा आणणारा घटनाबाह्य तसेच मा. आयुक्त महोदय, मत्स्यव्यवसाय यांच्या आदेशाची पायमल्ली करणारा निर्णय घेतला आहे. मा. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी केलेली कृती ही लोक कल्याणकारी राज्य संकल्पनेच्या विरोधात आहे. त्यामुळे त्यांचा निर्णय रद्द करण्यात यावा तसेच ठेका निवड समितीचे कोणीही सदस्य नसताना तसेच निवड समितीची कोणतीही बैठक झाली नसताना किंवा बैठक झाल्याचे कार्यवृत्त म्हणजेच प्रोसिडींग मा. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी त्यांचे म्हणणे मांडताना सोबत जोडले नसल्याने ते नियमानुसार कामकाज करण्याऐवजी मनमानी तसेच बेकायदेशीर भूमिका घेऊन आदिवासी बांधवांच्या पारंपारिक उदरनिर्वाहाच्या साधनावर म्हणजेच मासेमारी करण्याच्या उपजीविकेच्या व्यवसायावर चुकीच्या पध्दतीने ठेका रद्द केला नसून येत्या पाच वर्षासाठी मंजूर करण्यात आला नाही अशा पध्दतीची लोक कल्याणकारी राज्याच्या मार्गदर्शक तत्व प्रणालीच्या विरोधात भूमिका घेत आहेत.

राज्य सरकारने लोक कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून जाताना १०० एकर क्षेत्रातील तलावात मासेमारीचा ठेका आदिवासी बांधवांना देताना ० पैसे शुल्क आकारणी केली आहे यावरून राज्याचे सरकार हे लोक कल्याणकारी राज्याच्या भूमिकेतून कार्यरत आहे हे स्पष्ट आहे. मात्र, याच आदिवासींच्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटी यांना पाच वर्षासाठी मंजुरी देण्यात आली नाही आणि ठेके देखील रद्द करण्यात आले नाहीत अशी भाषा लोक कल्याणकारी राज्याच्या मार्गदर्शक तत्व प्रणालींच्या विरोधात आहे हे आम्ही आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अन्य दुर्बळ घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हेतूचा विकास साधण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे आले असताना महाड तालुक्यातील ४ आणि पोलादपूर तालुक्यातील १ आदिवासी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांना मासेमारीचा ठेका रद्द करण्यात आला नसून आगामी पाच वर्षांसाठी मंजूर करण्यात आला नाही हे मा. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे म्हणणे पाहता त्यांना भारतीय संविधानानुसार लोक कल्याणकारी राज्याच्या मार्गदर्शक तत्त्व प्रणालींचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी पाचही सोसायटया या आदिवासी कातकरी समाजबांधवांच्या सदस्यत्वाने स्थापन झाल्या असून त्या संबंधित तलावावर पारंपारिक मासेमारीच्या व्यवसाय करीत असणाऱ्या आदिवासी कातकरी समाज बांधवांनी एकत्रितपणे स्थापन केल्या आहेत. मा. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी आदिवासी बांधवांच्या विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांचा मासेमारीचा ठेका एकतर्फी रद्द करण्याचा निर्णय घेतला असून आगामी पाच वर्षात मंजूर न करण्याचा निर्णय घेतला आहे अशी भूमिका अपिलार्थी संस्थांच्या अपीलावर म्हणणे मांडताना नमूद केली आहे.

त्यामुळे मा. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी भारतीय संविधानाच्या भाग ४ मधील अनुच्छेद ४३बी आणि अनुच्छेद ४६ च्या विरोधातील भूमिका घेताना ते लोक कल्याणकारी राज्य असलेल्या महाराष्ट्र शासनाचे जबाबदार अधिकारी आहेत हे विसरून अपिलावर म्हणणे दिले आहे हे पाहता त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था यांचे मासेमारीचे ठेके पूर्ववत सुरू राहून त्यांचे आर्थिक उन्नतीचे तसेच सहकारी संस्थांच्या प्रोत्साहनाचे भारतीय राज्यघटनेने दिलेले लोक कल्याणकारी मार्गदर्शक तत्व अबाधित राहावे यासाठी राज्याच्या मत्स्य व्यवसाय आयुक्त यांनी आदेश पारित करण्याची विनंती आदिवासी-कातकरी विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांनी केली आहे.

या दरम्यान,ज्या मार्गदर्शक तत्व प्रणालींचा न्यायालयाद्वारे कायद्यांच्या स्वरूपात अंमलबजावणी करण्यात येऊ शकत नाही. मात्र मार्गदर्शक तत्व प्रणालींचा लोककल्याणासाठी देशातील राज्य सरकारांना नियम आणि सिध्दांत म्हणून उपयुक्त वापर करता येईल, या लोककल्याणकारी तत्वप्रणालींचा अनुसुचित जाती व जमाती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बळ या घटकांना न्यायनिवड्यापासून दूर ठेऊनही प्रवाहासोबत आणण्याचा प्रयत्न करण्याच्या अपेक्षेला सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची कृती हरताळ फासणारी आहे



## बदलते तंत्रज्ञान

# मेसेज टायपिंगचे आता टेंशन नाही

जगभरात ३.५ अब्जाहून अधिक वापरकर्ते असलेले सर्वात लोकप्रिय इन्स्टंट मेसेजिंग प, व्हॉट्सपने आपल्या वापरकर्त्यांचा अनुभव आणखी चांगला करण्यासाठी



एक नवीन वैशिष्ट्य सादर केले आहे. आता ग्रुप चॅटमध्ये टाइप करण्याचा त्रास कमी झाला आहे. व्हॉट्सपने ग्रुप व्हॉइस चॅट नावाचे एक नवीन टूल लाँच केले आहे. ज्यामुळे संभाषण आणखी सोपी आणि मजेदार बनणार आहे.

व्हॉट्सपचे हे नवीन फीचर विशेषतः अशा लोकांसाठी आहे जे ग्रुपमध्ये लांब मेसेज टाइप करणे टाळू इच्छितात. आता तुम्ही ग्रुप चॅटमध्ये थेट तुमच्या स्वतःच्या आवाजाने, हँड्सफ्री आणि रिअल-टाइममध्ये बोलू शकता. म्हणजेच कॉल न करता, थेट ग्रुपमध्ये थेट व्हॉइस चॅट सुरू करता येते जणू काही समोरासमोर संभाषण सुरू आहे. तुमच्या ग्रुपमध्ये ३-४ लोक असतील किंवा १०० पेक्षा जास्त सदस्य असतील तरीही आता सर्व वापरकर्ते या व्हॉइस चॅटचा लाभ घेऊ शकतात.

हे वैशिष्ट्य हळूहळू सर्व वापरकर्त्यांसाठी आणले जात आहे. जर हे अपडेट तुमच्या फोनवर अजून आले नसेल तर थोडी वाट पहा. लवकरच ते तुमच्या डिव्हाइसवरही उपलब्ध होईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आयओएस दोन्ही प्लॅटफॉर्मवर काम करेल.

**हँड्स-फ्री ग्रुप व्हॉईस चॅट कशी सुरू करायची**

१. ग्रुप चॅट उघडा:ज्या ग्रुपमध्ये व्हॉईस चॅट करायची आहे, तो ग्रुप चॅट उघडा.

२. व्हॉईस चॅट सुरू करा: ग्रुप चॅटमध्ये, व्हॉईस कॉल किंवा व्हॉईस चॅट या पर्यायावर क्लिक करा.

३. हॅड्स-फ्री मोड निवडा:व्हॉईस चॅट सुरू झाल्यावर, तुम्हाला हॅड्स-फ्री (hands-free) मोड निवडण्याचा पर्याय दिसेल. यावर क्लिक करा.

४. बोलणे सुरू करा:आता तुम्ही हॅड्स-फ्री मोडमध्ये ग्रुप व्हॉईस चॅटमध्ये बोलू शकता.

**फीचर व्हॉइस नोट्सपेक्षा वेगळे**

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की हे नवीन वैशिष्ट्य पारंपारिक व्हॉइस नोट्सपेक्षा वेगळे आहे. व्हॉइस नोट्स हे एकतर्फी मेसेज असले तरी व्हॉइस चॅट कॉल बटण दाबल्याशिवाय थेट ग्रुप संभाषण सुरू करून लाईव्ह ग्रुप कॉलिंग करता येईल.

# अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक पृथ्वीराज कपूर



### निमित्त

हिंदी चित्रपटसृष्टीतील 'मुघल-ए-आझम' म्हटल्या जाणाऱ्या अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचा आज स्मृतिदिन आहे. जगातल्या हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक नवा आयाम दिला आहे. त्यांनी आपल्या दमदार अभिनयाने त्याने सर्वांची मने जिंकली आहेत. पृथ्वीराज कपूर यांनी मूकपटांपासून आपल्या करिअरची सुरुवात केली आणि रंगीत चित्रपटांपर्यंतचा प्रवास केला. पृथ्वीराज कपूर यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९०६ रोजी पाकिस्तानातील समुद्री येथे झाला. लोक त्यांना 'बॉलीवूडचे ग्रँड फादर' म्हणतात. त्यांच्या वाढदिवसाच्या खास निमित्त त्यांच्याशी संबंधित रंजक किस्से जाणून घेऊया...

पृथ्वीराज कपूर यांनी लाहोरच्या एडवर्ड कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केले. यानंतर त्यांनी नाटक आणि नाट्यक्षेत्रात काम करण्याचा विचार केला. पण जास्त शिकलेले असल्यामुळे त्यांना नाटकात काम मिळालं नाही. यानंतर ते १९२९मध्ये मुंबईत आले आणि इम्पीरियल फिल्म कंपनीत विनापगार अतिरिक्त कलाकार म्हणून काम करू लागले.

पृथ्वीराज कपूर यांनी वयाच्या अवघ्या २४व्या वर्षी 'आलमआरा' या पहिल्या बोलक्या चित्रपटात तारुण्यापासून वृद्धापकाळापर्यंतची भूमिका साकारली होती. १९४१मध्ये आलेल्या 'सिकंदर'मध्ये त्यांनी सिकंदरची भूमिका केली होती. १९६०मध्ये 'मुघल-ए-आझम'ची भूमिका साकारून ते एक 'माईल स्टोन' बनले. 'आलमआरा'पूर्वी पृथ्वीराज कपूर यांनी नऊ मूकपटांमध्ये काम केले होते. १९२९मध्ये प्रदर्शित झालेला 'सिनेमा गर्ल' हा मुख्य अभिनेता म्हणून त्यांचा पहिला चित्रपट होता. या चित्रपटासाठी त्यांना ७० रुपये मानधन मिळाले होते.

१९६०मध्ये त्यांनी 'मुघल-ए-आझम' या चित्रपटामध्ये अकबराची भूमिका साकारली होती. हे पात्र त्यांच्या करिअरसाठी मैलाचा दगड ठरले. त्यांचा जबरदस्त अभिनय आजही लोकांच्या स्मरणात आहे. या चित्रपटात दिलीप कुमार, मुधुबाला, दुर्गा खोटे आणि निगार सुलतान यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटाने अनेक विक्रम मोडले. चित्रपटाची रंगीत आवृत्ती २००४ साली प्रदर्शित झाली होती.

पृथ्वीराज कपूर यांनी १९४४मध्ये पृथ्वी थिएटर्सची स्थापना केली. हे थिएटर देशभर गाजले होते. १६ वर्षांच्या प्रवासात त्यांनी जवळपास २६६२ नाटके सादर केली होती. आजकाल या थिएटरची देखभाल शशी कपूर यांची मुलगी संजना करत आहे. बॉलिवूडमधील कपूर कुटुंबाची गणना प्रसिद्ध कुटुंबांमध्ये केली जाते. शशी कपूर, शम्मी कपूर, ऋषी कपूर, राज कपूर, रणबीर, करीना, करिश्मा कपूर असे अनेक स्टार्स या घराण्यातून बॉलीवूडला मिळाले आहेत.

पृथ्वीराज कपूर यांचा शेवटचा चित्रपट 'आवारा', 'कल आज और कल' ज्यामध्ये कपूर कुटुंबातील तीन पिढ्यांनी काम केले. २९ मे १९७१ रोजी पृथ्वीराज कपूर यांनी या जगाचा कायमचा निरोप घेतला.

पृथ्वीराज कपूर यांना १९६९ साली कला क्षेत्रात पद्मभूषण देऊन भारत सरकारने सन्मानित केले होते. १९७२मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाला. १९५४मध्ये पृथ्वीराज कपूर यांना संगीत नाटक अकादमी फेलोशिप देण्यात आली. भारतीय सिनेमात त्याचीं सर्वाधिक प्रशंसा झाली **(साभार : इंटरनेट)**.

### बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# गरम पाण्यात मध, तर रात्री दही खाणे घातक

आपण जेवताना किंवा नकळत अशा काही गोष्टी खातो ज्यामुळे आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. वजन कमी करण्यासाठी काही लोक सकाळी कोमट पाण्यात मध घालून पितात. तर काही जण रात्रीच्या वेळेस दही खातात. यामुळे आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, असे आपल्याला वाटते, पण खरंच चुकीच्या फूड कॉम्बिनेशनमुळे तब्येत बिघडू शकते का?



कोणते पदार्थ एकत्र खाणे योग्य नाही? आयुर्वेदनुसार कोणते पदार्थ एकत्र खाऊ नये, याची माहिती आयुर्वेद डॉक्टर दीक्षा भावसार यांनी दिली आहे. त्यांनी आयुर्वेदानुसार कोणत्या गोष्टी एकत्र खाऊ नये याची माहिती शेअर केली आहे.

आयुर्वेदानुसार कोमट पाण्यात मध घालून पिणे हे विरुद्ध अन्न मानले जाते. शिवाय मध गरम करून खाऊ नये. मधामध्ये गोड, तुरट गुण असतात, जे शरीरातील कफ संतुलित ठेवतात. कोमट मध हे विष आहे, ज्यामुळे शरीरात एएमए किंवा विषारी घटक तयार होतात. याचे गुणधर्म शरीरात गेल्यावर विषामध्ये बदलते.

रात्रीच्या वेळेस शिवाय नुसते दही खाऊ नये. यासंदर्भात, दीक्षा भावसर सांगतात, लठ्ठपणा, कफाचे विकार, रक्तस्त्रावाचे विकार आणि दाहक स्थिती असलेल्या लोकांनी रात्रीच्या वेळेस दही खाणे टाळणे उत्तम. त्यामुळे दिवसा दही खावे.

जेवणाच्या अर्धा ते एक तास आधी फळे खाल्ल्यास शरीराला भरपूर पोषण मिळते, असे आरोग्य तज्ज्ञांचे म्हणणे आहे, मात्र जेवणानंतर फळे खाल्ल्यास अन्नासोबत फळांच्या अतिरिक्त कॅलरीज शरीरातून निघून जातात, ज्यामुळे आरोग्याला अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. अन्नासोबत फळे न खाणे आणि जेवल्यानंतरही लगेचं फळांचे सेवन न करणे हे उत्तम ठरते.

आयुर्वेदानुसार गरम पाण्याने केस धुतल्याने केस गळणे, केस पांढरे होणे यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे कोमट पाण्याने केस धुवू नये.

सायंकाळपेक्षा सकाळी व्यायाम करणे उत्तम. आपण सकाळी वेळ नसेल तर, आपण सायंकाळी हलका व्यायाम करू शकता, परंतु सायंकाळी जोमाने व्यायाम केल्याने कॉर्टिसॉल नावाचा हार्मोन रिलीज करू शकतो. ज्यामुळे झोपेमध्ये व्यत्यय येऊ शकते.

# श्रीवर्धन तालुक्यात वादळी पावसाने दाणादाण; जनजीवनावर परिणाम

## ◆ अनेक ठिकाणी साचले पाणी; नागरिकांचे नुकसान

**श्रीवर्धन : वार्ताहर**

श्रीवर्धन तालुक्यात व शहरात देखील अवकाळी पावसाने दाणादाण उडवून दिली. पावसाबरोबरच जोरदार वारे वाहत असल्याने अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या मोडणे, झाडे रस्त्यावरती पडणे, इत्यादी प्रकार घडले होते तर श्रीवर्धन दांडगुरी मार्गे बोरली पंचतन हा रस्ता खुजारे येथे रस्त्यावर नदीचे पाणी आल्यामुळे काही काळ बंद करण्यात आला होता.

वाळवटी या गावात देखील अनेक ठिकाणी पाणी तुंबल्याचे पाहायला मिळाले. तर शेखाडी मार्गे दिवेआगर रस्त्यावरती एक भला मोठा दगड दरड कोसळून



खाली आला होता. यामुळे या मार्गावरील वाहतूक देखील काही काळ ठप्प झाली होती. मागील आठवडाभरापासून अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा तयार होत होता. या कमी दाबाच्या पट्ट्याचे चक्रीवादळात रूपांतर होईल असा अंदाज देखील वर्तवण्यात आला होता. परंतु कमी दाबाच्या पट्ट्याचे चक्रीवादळात रूपांतर न होता निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये व किनारपट्टीच्या भागात जोरदार वादळी वारे व विजांच्या गडगडाटासह पाऊस पडला.

श्रीवर्धन जसवली मार्गावरती नायरा पेट्रोल पंपाच्या समोर देखील भरपूर पाणी भरले होते. त्या ठिकाणी देखील काही काळ वाहतूक ठप्प झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच श्रीवर्धन शहरातील उपजिल्हा रुग्णालय परिसरात देखील पाणी तुंबले होते. परंतु काही वेळानंतर सदर पाण्याचा निचरा होऊन ते निघून गेले. रविवारी रात्रीपासूनच पावसाने चांगला जोर धरला होता. ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाट यामुळे वीज पुरवठा देखील अनेक वेळा खंडित होत होता.


अवकाळी पावसामुळे हवेत खूप मोठ्या प्रमाणावर गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांना उष्म्या पासून सुटका मिळाली आहे. मात्र तालुक्यातील आंबा बागायतदारांचे खूप मोठ्या प्रमाणावरती नुकसान झाले आहे. कारण अद्याप तयार झालेला आंबा झाडावरती तसाच आहे व वादळामुळे सदरचा आंबा गळून फुकट गेला आहे.

आंबा पिकाबरोबरच अनेक वीट भट्टी मालकांचे देखील खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कच्च्या विटा पावसामुळे पूर्णपणे विरघळून गेल्या आहेत. अवकाळी आलेल्या पावसामुळे पर्यटन व्यवसायावर देखील विपरीत परिणाम झाला आहे. हॉटेल व लॉजचा धंद्यावर परिणाम झाला आहे.पाऊस सुरू झाल्यामुळे पर्यटकांनी श्रीवर्धन तालुक्याकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे.

## श्रीवर्धन शहरात गढूळ व दूषित पाण्याचा पुरवठा

**श्रीवर्धन : वार्ताहर**

चार दिवस पडलेल्या पावसानंतर श्रीवर्धन शहरामध्ये नगरपरिषदेकडून गढूळ व दूषित पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे. गेल्या वर्षी नगर परिषदेने जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित केला. परंतु जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित होऊन सुद्धा जर का जनतेला दूषित व गढूळ पाणी मिळत असेल तर याला जबाबदार कोण? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.



श्रीवर्धन शहराला रानवली या ठिकाणी असलेल्या पाझर तलावातून पाणीपुरवठा केला जातो. या पाझर तलावाच्या बाजूलाच जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला आहे. सदर जलशुद्धीकरण प्रकल्प सोलर विद्युत निर्मिती वरती चालवला जातो. जलशुद्धीकरण प्रकल्पाचे उद्घाटन झाल्यानंतर श्रीवर्धन शहरातील नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल अशी आशा होती. परंतु चार दिवस पडलेल्या पावसाने नगर परिषदेकडून गढूळ व दूषित पाण्याचा पुरवठा होणे श्रीवर्धन करांसाठी अतिशय विचित्र घटना आहे.

जलशुद्धीकरण प्रकल्प व जलवाहिन्या बदलण्यासाठी करोडो रुपयांचा खर्च करण्यात आला. परंतु एवढा खर्च करून श्रीवर्धन वासियांना जर का दूषित पाणीच मिळणार असेल तर जलशुद्धीकरण प्रकल्प निर्मितीचा काय फायदा? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने श्रीवर्धन वासियांना पिण्याचे शुद्ध पाणी पुरवावे. अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

## पाली-दापोडे परिसरात रासायनिक कचऱ्याचे साम्राज्य

**पाली : प्रतिनिधी**

पाली-दापोडे गावाजवळील परिसरात काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर रासायनिक कचरा टाकला गेल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. पाली-खोपोली महामार्गावरील एस्सार पेट्रोल पंप शेजारी घाण कचरा खुलेआम फेकून दिला जात आहे.

सद्यस्थितीत मान्सूनपूर्व मुसळधार पावसामुळे हा सर्व घातक कचरा पाण्यात मिसळून थेट आंबा नदीत पोहोचत आहे. हीच नदी पाली शहरातील हजारो नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत आहे. आंबा नदी पात्रात घाण कचरा मिसळत असल्याने जनतेतून संतापाची लाट उसळली असून यासंदर्भात कारवाईची मागणी केली आहे.

डंपिंग ग्राउंड प्रमाणे याठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असल्याने स्थानिक ग्रामस्थांनी यावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे.



## माथेरानमध्ये आपत्ती व्यवस्थापन कक्ष

**माथेरान : बातमीदार**

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे असल्याने पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती निर्माण होत असते. त्यामुळे रायगड जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने नगरपरिषद आणि अधीक्षक यांच्याकडून आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करून कार्यान्वित करण्यात आला आहे. या आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि कक्षाच्या कामकाजावर माथेरान पालिका मुख्याधिकारी आणि माथेरान महसूल अधीक्षक, वन अधिकारी, पोलीस अधिकारी हे लक्ष ठेवून असणार आहेत.

रायगड जिल्हाधिकारी तसेच कर्जत प्रांत अधिकारी यांच्या आदेशाने महसूल अधीक्षक सुरेंद्रसिंह ठाकूर आणि पालिका मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामध्ये पूर्वसूचना गट, शोध सुटका निवारण व्यवस्थापन कक्ष, वैद्यकीय कक्ष आणि स्वच्छता आरोग्य व्यवस्थापन कक्ष बनविण्यात आले आहेत. यातील प्रमुख आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक म्हणून पालिकेचे कार्यालयीन प्रमुख सदानंद इंगळे हे काम पाहणार आहेत. वैद्यकीय विभाग बी. जे. रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली पाटील या पथक प्रमुख असणार आहेत आणि स्वच्छता आरोग्य




विभागात स्वच्छता निरीक्षक नरेंद्र सावंत हे पथक प्रमुख आहेत.आपत्ती व्यवस्थापन कक्षच्या पूर्वसूचना गटमधील अधिकारी, कर्मचारी यांनी आपत्ती व पावसाचे पाणी याबाबत जिल्ह्यातील प्रशासन व यंत्रणेशी समन्वय साधने, सर्व घटनांचे संकलन करून त्याचा दैनंदिन अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे, नियंत्रण कक्ष आपत्तीच्या काळात सुरक्षितपणे सुरू ठेवणे, माथेरान नगर परिषद हद्दीत कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ उपाययोजना करणे,नगर परिषद कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कंट्रोल रूममध्ये कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणे आदी कामांची जबाबदारी असणार आहे.

माथेरान शहरातील शाळांची स्थलांतराचे ठिकाण म्हणून निवड केली आहे. त्या शाळांची दुरुस्ती करून घ्यावी, अशा सूचना दिल्या.



### सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, कै. बाबुराव नामा नाईक मयतचे वारस श्रीमती बामुबाई बाबुराव नाईक वगैरे, श्रीमती गिरजाबाई रामा म्हात्रे, श्रीमती धर्मुबाई राम वास्कर यांना सिडको लि. यांच्याकडून २२.५ टक्के योजने अंतर्गत खालील वर्णनाचा भूखंड वितरीत करण्यात येणार आहे.

**मौजे - पुष्पकनगर-दापोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सिडको फाईल नं. | भूखंड क्रं. | सेक्टर नं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| ४८ | १३ | २ | ९६० चौ.मी. |

सदर भूखंडाबाबत मुळ लिज हक्कदार कै. बाबुराव नामा नाईक, वगैरे यांनी आमचे अशिल मे. वरुण बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. सौ. वरुणा अशोक मेवाणी यांच्या लाभात करारनामा लिहून दिलेला असून त्यापोटी आमच्या अशिलांकडून बरीच मोठी रक्कम स्विकारलेली आहे. त्याअनुषंगाने आमच्या अशिलांनी वर नमूद भूखंडाबाबत पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात स्पे.मु.नं. ८१/२०१५ हा दावा दाखल केलेला आहे. परंतु, कै. बाबुराव नामा नाईक चे वारस श्रीमती बामुबाई बाबुराव नाईक, वगैरे व इतर हे अनाधिकाराने सदर भूखंडामध्ये त्रयस्थांचे हक्क, हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांना समजले आहे. सबब, प्रस्तुतची सावधान नोटीस आमचे अशिल प्रसिध्द करीत आहेत.

सबब, तमाम जनतेस या नोटीसीने सावधान करण्यात येत आहे की, वर नमूद भूखंडाबाबत श्रीमती बामुबाई बाबुराव नाईक, वगैरे अथवा इतर कोणाहीबरोबर कोणत्याही स्वरुपाचा करार/मदार / व्यवहार करु नये आणि केल्यास असा व्यवहार बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**तारीख: २९/०५/२०२५.**

**सही/-**
**अॅड. श्री. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय: २. आशादिप अपार्टमेंट**
**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ**
**अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल,**
**ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**
**मो. क्र.: ९९३०३६९८६१**


## कोकण प्रांत संघ शिक्षा वर्गात शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कोकण प्रांत, संघ शिक्षा वर्ग (सामान्य) विद्यार्थी वयोगटाचा वर्ग शुक्रवार दिनांक १६ मे ते रविवार१ जून या कालावधीत कै.विजया गोपाल गांधी वनवासी कल्याण आश्रमशाळा माणगाव येथे सुरू आहे. या वर्गात स्वयंसेवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध प्रशिक्षणात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वयंसेवकांना ऐतिहासिक साधनांची माहिती व्हावी तसेच शिवकालीन शस्त्रे प्रत्येक्ष पाहता यावीत यासाठी शिवकालीन शस्त्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे उदघाटन सर्वाधिकारी दत्ताराम सोलकर



यांच्या हस्ते शस्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

या शस्त्र प्रदर्शनात ढाल ,तलवार, धनुष्यबाण , शिरस्त्राने, चिलखत, जिरेटोप , वाघनखे,गुप्ती, बरची, भाला, दांडपट्टा इत्यादी शस्त्रांचे प्रदर्शन व माहिती देण्यात आली आहे. शस्त्र संग्राहक अभयराजे जगताप यांनी ही शस्त्र प्रदर्शनी संग्रहित केली असून त्यांच्या सहयोगातून हे शस्त्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

या संघ शिक्षा वर्गाचा प्रकट समारोप शनिवार ३१ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता जयंत गांधी मेमोरियल हॉल माणगाव येथे होणार आहे. या प्रकट समारोह दिनी सदर शस्त्र प्रदर्शनीचे प्रदर्शन समारोप स्थानी भरविण्यात येणार आहे. नागरिक बंधू ,भगिनी,इतिहास प्रेमी नागरिकांनी या शस्त्र प्रदर्शनास भेट द्यावी तसेच प्रकट समारोहास उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

## भारत माता की जय, वंदे मातरम् घोषणांनी मुरूड नगरी दणाणली!

**मुरुड : प्रतिनिधी**

ऑपरेशन सिदुंरच्या यशानंतर भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ नांदगाव येथील श्री सिद्धिविनायक मंदिरा पासून ते मुरुड शहरा पर्यत मोटार सायकल वरुन तिरंगा रॅली काढण्यात आली.

यावेळी भारत माता की जय... वंदे मातरम घोषणींनी मुरुड तालुक्यातील परिसर दाणानून गेला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैन्याने पाकिस्तानला सडेतोड उत्तर दिले. भारतातील निष्पाप नागरिकांवर पाक पुरस्कृत भ्याड दहशतवादी हल्ल्याला ऑपरेशन सिंदूर माध्यमातून शौर्य, कौशल्य, अचूकता, समन्वय आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भारतीय लष्कराच्या तिन्ही दलांनी जगाला आपली ताकद दाखवून दिली. पाकिस्तानला हादरवून सोडले. भारतीय सैनिकांच्या या पराक्रमाबद्दल आणि सन्मानार्थ मुरुड वासियांनी श्री सिद्धिविनायक मंदिरापासून ते मुरुड शहर तद्नंतर तहसीलदार कार्यालया पर्यत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आली .

ऑपरेशन सिंदूर मध्ये शहीद झालेल्या सैनिकांना व दहशतवादी हल्ल्यातील मृत नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.





### उरण नगरपरिषद उरण

**ता. उरण, जिल्हा रायगड, पिन कोड - ४००७०२**

Email ID : uranmunicipal@gmail.com    दूरध्वनी क्रमांक : ०२२२७२२२३२०

जा.क्र.उपन/बांवि/५५७/२०२५/२६    दिनांक : २८/०५/२०२५

**जाहीर सूचना**

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये जाहीर सूचना**

उरण नगरपालिका क्षेत्रातील मिळकतीधारकांना सूचित करण्यात येते, की पावसाळ्याचे दिवस येत आहेत. आपल्या इमारतीचा कोणताही भाग धोकादायक स्थितीत, पडावयास झालेला असल्यास अथवा काही भाग अर्धवट पडलेल्या स्थितीत असल्यास तो भाग त्वरित काढून टाकावा. तसेच धोकादायक इमारतींची तज्ञ स्ट्रक्चरल इंजिनिअर मार्फत पाहणी करुन त्यांच्या अहवालाची एक प्रत नगरपालिकेत जमा करावी. सदरच्या पडावयास झालेल्या भागाची किरकोळ दुरुस्ती असेल तर ती नगरपरिषदेची पूर्वपरवानगी घेवून पडावयास झालेल्या किंवा जीर्ण अवस्थेत असलेल्या भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. जुने बांधकाम पाडून नवीन बांधकाम करावयाचे झाल्यास तसे विहीत प्रस्ताव नगरपरिषदेकडे दाखल करुन रितसर परवानगी घेवून बांधकाम करावे.

रस्त्यास कडेस धोकादायक इमारत असल्यास रस्त्याने जाणा-या-येणा-या नागरीकांचे जीवितास कोणताही धोका पोहचणार नाही याची दक्षता घ्यावी. याकामी संबंधित नागरीकांनी वेळीच दक्षता न घेतल्यास कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. धोकादायक इमारतीमुळे कोणतीही वित्तीय अगर जीवित हानी झाल्यास मिळकतधारकांची जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

धोकादायक इमारतींबाबत किंवा जागेबाबत वाद असल्यास न्यायालयाचे कोणतही आदेश असल्यास त्याचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी. धोकादायक इमारतीबाबत न्यायालयाचे निदर्शनास आणून न्यायालयाची पूर्वपरवानगी घेवून कार्यवाही करण्यात यावी. याबाबत स्पष्ट नोंद घ्यावी. नगरपरिषदेस सहकार्य करावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद , उरण**


## अलिबाग येथे १ जून रोजी पाऊस गीतांची मेजवानी

**अलिबाग : प्रतिनिधी**

समर्थ इन्व्हेस्टमेन्ट या संस्थेतर्फे अलिबाग येथे मेघा रे मेघा रे हा पाऊस गीतांचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. १ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता मेघा टॉकीज येथे हा स्वरसोहळा होणार आहे.




सुप्रसिदध पार्श्वगायक ऋषिकेश रानडे , लोकप्रिय गायक व संगीतकार वसंत देसाई यांचू पणतू नचिकेत देसाई आणि मोना कामत ही गायक मंडळी मराठी आणि हिंदी भाषेतील धम्माल पाऊस गीते सादर करणार आहेत. आघाडीचे रेडिओ जॉकी अमित काकडे या कार्यक्रमात सुसंवाद साधणार आहेत.

संगीत संयोजन ओंकार देवस्कर करतील. हा कार्यक्रम प्रेक्षकांसाठी पूर्णपणे मोफत असणार आहे. मात्र प्रवेशिका असणार्यांनाच प्रवेश असेल. कार्यक्रमाच्या प्रवेशिका संस्थेच्या कुबेराक्षे मारूती नाका अलिबाग येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी प्रियज कवळे (७३७८५१३२६०) आणि वृशाली पाटील (९३२६८६३५६१) यांच्याशी संपर्क साधावा.



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १३/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | खांदा कॉलनी पनवेल येथील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती...... खांदा कॉलनी पनवेल मधील प्रशासकीय इमारतीच्या मँगलोर टाइल केलेल्या छताचे नूतनीकरण करणे. (दुसरी मागणी) | ₹ ३१,८५,१३०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३०/०५/२०२५ ते दिनांक ०९/०६/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ०२/०६/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०३/०६/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## निवडक

### पनवेलमध्ये आज नेत्रचिकित्सा शिबिर

**पनवेल :** रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल नवी मुंबई पोलीस आयुक्तालय परिमंडळ २ पनवेल व आर.झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयुक्तालयातील अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि.२९) सकाळी ९ ते दुपारी २ वाजता पनवेल शहर पोलीस ठाणे येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ परिमंडळ २ हद्दीतील सर्वच अधिकारी व कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांनी घ्यावा, असे आवाहन रोटरीचे अध्यक्ष शैलेश पोटे, मेडीकल डायरेक्टर डॉ.लक्ष्मण आवटे व सचिव दीपक गडगे यांनी केले आहे.

### नवी मुंबईत सावरकर जयंती साजरी



**नवी मुंबई :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्ताने सावरकर चौकात पुष्पांजली अर्पण व अभिवादन कार्यक्रम साजरा करण्यात आला. स्वप्निल घोलप यांनी मार्गदर्शन करताना स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणजे प्रखर देशभक्तीचा जाज्वल्य विचार, ज्यातून राष्ट्रप्रथम ही भावना रुजून ऊर्जा मिळते असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे नियोजन सकल हिंदू समाज नेरूळ, संतोष कदम, उदय साळवी, के.जी.पाई, प्रशांत चौधरी आदिंनी केले होते.

### अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**पनवेल :** परिसतातील एक व्यक्ती उपजिल्हा रुग्णालयात मृत पावला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. अनोळखी बेवारस व्यक्तीचे वय अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, उंची अंदाजे पाच फुट, चेहरा उभट, अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी मिशीचे केस काळे वाढलेले, अंगात नेसुन मळकट लाल शर्ट, क्रिम रंगाचे मळकट जॅकेट, मळकट ट्रॅक पॅन्ट आहे. याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पोलीस निरीक्षक अनंत परागे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महावितरणच्या प्रकाशदुतांचे भर पावसात काम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

गेल्या तीन दिवसांपासून रायगड जिल्ह्यात पावसाने थैमान घातले आहे. संततधार कोसळणाऱ्या पावसामुळे अनेक ठिकाणी वीज यंत्रणेचे नुकसान झाले आहे. महावितरणच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता भर पावसात डोंगर दऱ्यातून वीज यंत्रणेच्या दुरुस्तीचे काम करून ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत केल्याबद्दल मुख्य अभियंता, भांडूप परिमंडल संजय पाटील यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे तसेच पावसाळ्यात काम करताना योग्य काळजी घेण्यास सांगितले आहे.



रायगड जिल्यातील डोंगर दऱ्यातून जाणाऱ्या रोहा, अलिबाग, श्रीवर्धन व इतर भागात पावसाळ्याच्या दिवसात अखंडित वीजपुरवठा करणे हे खूप जिकरीचे काम आहे. वादळी वाऱ्यासह आलेल्या या पावसामुळे महावितरणच्या वीज यंत्रणेला मोठे नुकसान झाले आहे. रोहा येथील २२ केव्ही माणगाव फीडरमध्ये एक उच्चदाब खांब कोसळला, तर दोन उच्चदाब खांब वाकून राजिवली गावातील वीजपुरवठा खंडित झाला होता. महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भर पावसात काम सुरू केले. याठिकाणी दुरुस्तीच्या कामाला जाण्यासाठी अनेक अडथळे येत होते. कार्यकारी अभियंता प्रदीप दाळु यांनी बाधित ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी तात्काळ कारवाई केली व अशा या अवघड परिस्थितीत रोहा विभागातील कर्मचाऱ्यांनी काम करून ग्राहकांचा वीजपुरवठा सुरळीत केला आहे.

अलिबाग येथे ६३ केव्ही डीटीसीमध्ये बिगाड झाल्यामुळे वडखळ व कुरळ येथील ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. तर, १०० केव्ही डीटीसीमध्ये बिगाड झाल्यामुळे आरती नगर, धामनी, न्यू आर पी नगर, वडखळ व जिते गाव मिळून एकूण १० रोहित्र बिगाड झाले होते व ३० विद्युत खांब वाकले किंवा पडले होते. कार्यकारी अभियंता शैलेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली २४ तासाच्या आत ५ रोहीत्रांची उभारणी केली आहे व इतर ५ रोहित्र उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याशिवाय, महावितरणच्या गोरेगाव विभागातील २२ के व्ही लोणेरे, पाचाड, जांभूळ, खामगाव, बोर्ली व खोपोली मिळून ६६ गावात एकूण ११२ डीटीसी पावसामुळे खराब झालेले, कार्यकारी अभियंता रामकृष्ण पाटील यांनी व त्यांच्या चमूनी मेहनत करून २४ तासांच्या आत वीजपुरवठा सुरळीत केला.

भांडूप परिमंडळाने भर पावसात अत्यंत खडतर परिस्थितीमध्ये काम करून यशस्वीरीत्या सर्व यंत्रणा पूर्व पदावर आणली याबाबत भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता संजय पाटील यांनी सर्वांनी केलेल्या समर्पित प्रयत्नांचे कौतुक केले आहे. पावसाळ्यात अनपेक्षित परिस्थिती उद्भवू शकते जेणेकरून वीजपुरवठा खंडित होऊ शकतो, म्हणून ग्राहकांनी अशा वेळेस महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

## रखडलेल्या कामांमुळे अडचणींत वाढ

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली मध्ये सुरू असलेली विकास कामे सध्या पावसामुळे नागरिकांना अडचणींचा ठरत आहे. येथील संथ गतीने होणाऱ्या कामांना लवकर प्रगती पथावर आणावे, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी पनवेल पालिकेकडे केली आहे.



कळंबोली वसाहतीमध्ये सध्या मोठ्या प्रमाणावर ती रस्त्याचे काँक्रिटीकरण व गटाराची कामे सुरू आहेत, परंतु पंधरा दिवस आधी मान्सून सुरू झाल्याने कळंबोली वसाहत जलमय झाले आहे त्यामुळे अपूर्ण झालेली उन्हाळी कामे आता नागरिकांची चिंता वाढवत आहेत. मुली वसाहतीमधील टप्प्याटप्प्याने होत असलेले रस्त्याची कामे पावसाळ्यापूर्वी होणे अपेक्षित होते. वाहतुकीसाठी एकाच बाजूचा रस्ता उपलब्ध होत असल्याने हा रास्ता अपुरा पडत आहे. तसेच विद्युत वाहिन्यांवर झाडे पडल्याने वीजपुरवठा वारंवार खंडित होत आहे. कळंबोली वसाहतीमध्ये रस्ता, वीज पायाभूत गरजांवरच गदा आल्याचे चित्र आहे.

सोमवारी पडलेल्या मुसळधार पावसामध्ये वसाहतीमधील अनेक घरांमध्ये पाणी शिरले होते. या वेळी पनवेल पालिकेचे अधिकारी व जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी कळंबोली वसाहतीचे संयुक्त पाहणी केली.

## चारचाकी वाहनांची रस्त्यावर दुरूस्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा वसाहतीत रस्त्यावर चार चाकी वाहने दुरुस्त केली जात आहेत. त्यामुळे या ठिकाणी राहणाऱ्या सोसायटी धारकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. कळंबोली वाहतूक विभागाने यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

खांदा कॉलनी शहरात सेक्टर एक परिसरात रस्त्यावरच चार चाकी वाहने दुरुस्त केली जात आहेत. या ठिकाणी अनेक सोसायटी आहेत. या सोसायट्यांच्या गेटसमोरदेखील अनेकदा वाहने उभी करण्यात येत असल्याने त्याचा त्रास या सोसायटी धारकांना होत आहे. रस्त्यावरच वाहने दुरुस्त होत असल्याने अनेकदा रस्त्यावरून येणाऱ्या



जाणाऱ्या वाहन चालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीदेखील होते.

कळंबोली वाहतूक विभागाच्या अंतर्गत खांदा कॉलनी येत असल्याने वाहतूक विभागाने याकडे लक्ष देऊन कारवाई करणे गरजेचे आहे, मात्र वाहतूक पोलीस जाणून बुजून याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे. रस्त्यावर वाहने दुरुस्त करणे चुकीचे आहे. येथे वाहन दुरुस्त करणाऱ्यांनी संपूर्ण रस्ता पादाक्रांत केला आहे.

## मागासवर्गीय मुलींना शासकीय वसतिगृह प्रवेशाकरिता आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, सेक्टर १०, प्लॉट नंबर २१ ग्रीन पार्क सोसायटी समोर कळंबोली, पनवेल येथे कार्यरत आहे. या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृहात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातकरिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छूक विद्यार्थीनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, पनवेल श्रीमती उषा शशिकांत गुजेला यांनी केले आहे.

या शासकीय वसतिगृहात आठवीपासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, आर्थिकदृष्टया मागास, अनाथ व अपंग गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनींकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा-दररोज पोहे/ शिरा/उपीट इ. पैकी एक, उकडलेली दोन अंडी, सफरचंद, ऋतुमानानुसार एक फळ व दूध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ, भात, चपाती, भाजी/ उसळ, लोणचे, पापड इ.सह आठवडयातून दोन वेळा मासांहार) देण्यात येते.

प्रवेशपात्र विद्यार्थीनींच्या पालकांचे सर्व मार्गानी वार्षिक उत्पन्न अनु.जाती, अनु.जमाती विद्यार्थीनींकरिता रुपये दोन लाख ५० हजार चे आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग विद्यार्थीनींकरिता रुपये एक लाखाचे आत असावे. ऑनलाईन प्रवेश अर्जासोबत तहसीलदार यांचे सहीचा सन २०२५-२६ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्र, आधारकार्ड या आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.

सन-२०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात उपलब्ध करण्यात आलेले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल उषा शशिकांत गुजेला (गृहपाल) (८७६७३३९९७४) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबईत कॅन्सर व्हॅनला चांगला प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेची रुग्णालये व नागरी आरोग्य केंद्र स्तरावर राष्ट्रीय असांसर्गिक रोग तपासणी कार्यक्रमांतर्गत ३० वर्षावरील स्त्री व पुरुषांची तपासणी करण्यात येते व त्याची नोंदणी पोर्टलवर करण्यात येत असते. या कार्यक्रमांतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह, मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग याबाबत तपासणी व चाचण्या केल्या जात आहेत. तसेच सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ येथे संशयित रुग्ण संदर्भित करण्यात येत आहेत.



राष्ट्रीय असांसर्गिक रोग तपासणी कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिनांक २१ ते २४ मे २०२५ या कालावधीत शासनामार्फत कॅन्सर व्हॅन पाठविण्यात आली होती. सदर व्हॅनमध्ये मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग याबाबत तपासणी व चाचण्या करण्यात आल्या. या मोहीमेचे नियोजन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत करण्यात आले. या अंतर्गत चार नागरिक आरोग्य प्राथामिक केंद्रांच्या क्षेत्रात रुग्ण तपासणी करण्यात आली.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या तपासणीचा लाभ ६२७ नागरिकांनी घेतला. यामध्ये ४९१ नागरिकांनी मुख कर्करोग, २८९ नागरिकांनी स्तन कर्करोग व ७७७ महिलांनी गर्भाशय मुख कर्करोग विषयक तपासणी करून घेतली.

यामध्ये २१ मे २०२५ रोजी राजमाता जिजाऊ रूग्णालय, ऐरोली येथे ९१ लाभार्थींनी या तपासणीचा लाभ घेतला त्यामध्ये मुख कर्करोगकरिता ७८, स्तन कर्करोगकरिता ५८ व गर्भाशय मुख कर्करोगाची ४५ नागरिकांनी तपासणी करून घेतली. या तपासणीप्रसंगी डॉ. अशफाक सिद्धीकी, डॉ. रविंद्र म्हात्रे व डॉ.सचिन चिटणीस हे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

अशाचप्रकारे २२ मे २०२५ रोजी श्रमिक नगर, पावणे येथे १८५ लाभार्थींनी तपासणीचा लाभ घेतला. त्यामध्ये मुख कर्करोगकरिता १८५, स्तन कर्करोगाकरिता ९२ व गर्भाशय मुख कर्करोगकरिता ४० रुग्ण यांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीकरिता डॉ. अशफाक सिद्धीकी व डॉ.वंदना नारायणे हे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

२३ मे २०२५ रोजी गावदेवी मैदान, जुहूगांव येथे १५५ लाभार्थींनी या तपासणीचा लाभ घेतला. त्यामध्ये मुख कर्करोगकरिता १५५, स्तन कर्करोगकरिता ५६ व गर्भाशय मुख कर्करोगकरिता ३६ रुग्ण यांची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीकरिता डॉ. अशफाक सिद्धीकी व विद्या वर्मा हे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

२४ मे २०२५ रोजी मॉसाहेब मिनाताई ठाकरे हॉस्पिटल, नेरुळ येथे १९६ लाभार्थींनी तपासणीचा लाभ घेतला. त्यामध्ये मुख कर्करोगकरिता ११३, स्तन कर्करोगकरिता ८३ व गर्भाशय कर्करोगकरिता ५६ नागरिक यांनी तपासणी करून घेतली. सदर तपासणीकरिता वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे आणि डॉ. अशफाक सिद्धीकी, डॉ. उध्दव खिलारे व डॉ.सुरेश पाटील हे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.

### असंसर्गिक आजार अंतर्गत उपक्रम

**६२७ जणांनी घेतला सुविधेचा लाभ**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३० वर्षावरील ६२७ स्त्री व पुरुष लाभार्थी यांनी राष्ट्रीय असांसर्गिक रोग तपासणी कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनमार्फत पाठविण्यात आलेल्या विशेष कॅन्सर व्हॅनमध्ये तपासणी व चाचण्यांच्या सुविधेचा लाभ घेतला.

## आमदार म्हात्रेंकडून महिलांना एकवीरा देवीचे दर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे व माजी नगरसेवक तथा बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे यांच्या माध्यमातून हजारो महिला भाविक भक्तांची एकविरा आई दर्शन मोफत सहल आयोजित करण्यात आली होती. हजारो महिलांना एकविरा आईचे दर्शन घडले आहे तसेच या वेळी नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील उपस्थित होते.



एकविरा आईच्या दर्शनाने त्यांचे दु:ख, अडीअडचणी दूर होतील, अशी भावना आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केली. सहलीसाठी कोणतीही जाहिरात न करता हजारो महिलांनी आपल्याकडे नावनोंदणी केली, मात्र मोठ्या संख्येने बसची व इतर व्यवस्था करणे शक्य नसल्याने उर्वरित मतदारांना विभागनिहाय टप्प्याटप्प्याने एकविरा आईचे दर्शन घडवणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी एकविरा देवीच्या ठिकाणची पंतप्रधानांच्या मन की बातचे आयोजनदेखील करण्यात आले होते. त्याचबरोबर महिलांकरिता करमवणूकसाठी लकी ड्रॉच्या माध्यमातून १० विजेत्या महिलांना आकर्षित पैठणी देऊन सन्मानित केले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत सुहासिनी नायडू, सुचित्रा पवार, मालती सोनी, कल्पना शिंदे, पांडुरंग आमले, महेंद्र नाईक, जयवंत तांडेल, भास्कर यमगर, अजय सिंग, संजय ओबेरॉय, मनोहर बाविस्कर व हजारो महिला भगिनी व नागरिक उपस्थित होते.

## महावितरणच्या सहायक अभियंत्यांची प्रतीक्षा यादी लवकरच होणार जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरणकडून सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे अभियांत्रिकी पदवीधारक (वितरण/स्थापत्य) ३४२ उमेदवारांची सहायक अभियंता पदासाठीची निवड यादी जाहीर करण्यात आली होती. या निवड यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांच्या पडताळणी दरम्यान अपात्र व गैरहजर तसेच नियुक्तीपत्रातील विहीत मुदतीमध्ये रुजू न झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणात महावितरण कंपनीच्या नियमाप्रमाणे प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणानुसार प्रतीक्षा यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रतीक्षा यादी प्रसिध्द करण्यात येणार आहे.

महावितरणच्या जाहिरात क्र. ०७/२०२३ अन्वये अभियांत्रिकी पदवीधारक (वितरण-३०२ व स्थापत्य-४०) सहायक अभियंता पदाच्या ३४२ जागांसाठी सरळ सेवा भरती प्रक्रिया राबविली आहे. त्याप्रमाणे १४ जानेवारी २०२५ रोजी सहायक अभियंता पदासाठी निवड यादी जाहीर करण्यात आली.

**कनिष्ठ अभियंतापदी ९१ उमेदवारांना नियुक्तीपत्र**

कनिष्ठ अभियंतापदी अभियांत्रिकी पदविकाधारक ९१ उमेदवारांची निवड प्रक्रिया नुकतीच पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार सरळ सेवा भरतीद्वारे ७२ तर अनुकंपा तत्त्वानुसार १९ उमेदवांराची निवड करण्यात आली आहे. अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून या उमेदवारांना परिमंडलस्तरावर नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

# पांडवकडा इकोटुरिझम आणि जलसंवर्धन प्रकल्प म्हणून विकसित करण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील खारघर टेकड्यांवरील पांडवकडा टेकड्यांवर पावसाळी उत्सव साजरा करणाऱ्यांचा एक गट अडकल्याने, कार्यकर्त्यांनी या परिसराला इकोटुरिझम आणि जलसंवर्धन प्रकल्प म्हणून विकसित करण्याची मागणी केली आहे. पांडवकडा योग्यरित्या विकसित करण्याच्या कल्पनेसह कार्यकर्त्यांनी आधीच वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी संपर्क साधला आहे. त्यांनी हा प्रकल्प हाती घेण्याचे आश्वासन दिले आहे.

अनेक साहसी क्रीडाप्रेमी वर्षभर पांडवकड्यावर जात राहतात. पावसाळ्यात ही संख्या वाढून जलक्रीडा प्रेमी धबधब्यांमध्ये जातात. पोलिसांनी कितीही बंदीचे प्रयत्न केले तरी त्यांना थांबवता येत नाही, असे नॅटकनेक्ट फाउंडेशन आणि खारघर हिलँड वेटलँड्स फोरमने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या



पत्रात म्हंटले आहे. या क्षेत्राची मालकी असणाऱ्या सिडकोने लोकांच्या प्रवेशावर बंदी घातली आहे. परंतु डोंगररांगा. इतक्या विस्तीर्ण आहेत की पर्यटक कुठूनही टेकड्यांवर जाऊ शकतात, असे खारघर हिलँड वेटलँड्स फोरमच्या ज्योती नाडकर्णी यांनी निदर्शनास आणून दिले. पांडवकडा टेकड्या इकोटुरिझम स्थळ म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव वन विभागाने दुर्लक्षित केला असल्याचे नाडकर्णी म्हणल्या. अधिकाऱ्यांना लोकांच्या सुरक्षिततेची काळजी नाही का? अशी खंत नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी व्यक्त केली.

बऱ्याच काळापासून आम्ही सिडको आणि वन विभागाला धबधब्यांमध्ये प्रवेशाचे नियमन करण्याची विनंती करत आहोत. योग्य सुरक्षा तपासणी करून लोकांना त्यांचे जीवन का धोक्यात घालावे लागते, असे कुमार म्हणाले आणि लोकांना त्यांचे जीवन का धोक्यात घालावे लागते याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. वन विभागाने धबधब्यांवर एक भिंत, तिकिट काउंटर आणि कपडे बदलण्याची खोली बांधली आहे आणि हे सर्व वाया गेले आहे, असे नाडकर्णी म्हणाले.

पांडवकडा हे मुंबईनजिक असलेले पर्यटन स्थळ आहे. मात्र येथे सुविधा नसल्याने मान्सूनचा आनंद घेण्यासाठी लोणावळा-खंडाळा आणि माळशेज घाटांवर गर्दी करावी लागते, असे कुमार यांनी युक्तिवाद केला.

# लखनऊला नमवून आरसीबी क्वालिफायर-१मध्ये

**लखनऊ : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने लखनऊ सुपर जायंट्सवर दणदणीत विजय मिळवत आयपीएलच्या क्वालिफायर-१मध्ये आपले स्थान पक्के केले आहे. आरसीबीने कार्यवाहू कर्णधार जितेश शर्माच्या वादळी खेळीच्या जोरावर लखनऊचा सहा विकेट्सने पराभव केला आहे. याशिवाय आरसीबीने इतिहासात पहिल्यांदाच सर्वात मोठे (२२८) लक्ष्य यशस्वीपणे पार करत विजय मिळवला आणि गुणतालिकेत दुसरे स्थान मिळवले आहे.

जितेश शर्माने अवघ्या ३३ चेंडूत आठ चौकार आणि ६ षटकारांच्या मदतीने ८५ धावा चोपल्या. त्याला विराट कोहली (३० चेंडूत ५४) व



मयंक अग्रवालची (२३ चेंडूत ४१) चांगली साथ मिळाली. दरम्यान, या सामन्यात जितेश शर्माला तीन वेळा जीवनदान मिळाले होते, ज्याचा त्याने फायदा करून घेतला. जितेशने ३३ चेंडूत आठ चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ८५ धावांची नाबाद खेळी केली. आयपीएल कारकिर्दीतील त्याचे हे पहिले अर्धशतक ठरले.

तत्पूर्वी लखनऊच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना मिचेल मार्शने ३७ चेंडूत चार चौकार आणि पाच षटकाराच्या मदतीने ६७ धावांची दमदार खेळी केली. त्यानंतर कर्णधार ऋषभ पंतने ६१ चेंडूत ११ चौकार आणि आठ षटकाराच्या मदतीने ११८ धावांची नाबाद खेळी करीत निर्धारित २० षटकात तीन विकेट्सच्या मोबदल्यात संघाच्या धावफलकावर २२७ धावा लावल्या.

जोश हेजलवूडच्या अनुपस्थितीत आरसीबीची गोलंदाजी खूपच कमकुवत दिसली. नुवान थुशारा याने २६ धावा खर्च करून एक विकेट घेतली. त्याच्याशिवाय क्रुणाल पांड्याने दोन षटकात फक्त १४ धावा खर्च केल्या. अन्य गोलंदाज महागडे ठरले. भुवनेश्वर कुमार आणि शेफर्ड यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली, पण त्यांनी धावाही अधिक खर्च केल्या.

### बंगळुरू संघाची ऐतिहासिक कामगिरी

आयपीएलमध्ये बऱ्याच वर्षांनंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ हा पहिल्या दोन क्रमांकावर राहत क्वालिफायर-१साठी पात्र ठरला आहे. त्याबरोबरच बंगळुरूने केलेला खास विक्रम म्हणजे यंदाच्या हंगामात बंगळुरूने साळखी फेरीमध्ये प्रतिस्पर्धी संघाच्या घरच्या मैदानात खेळलेले सर्वच्या सर्व सात सामने जिंकले आहेत. आयपीएलच्या इतिहासात अशी कामगिरी करणारा बंगळुरू हा पहिला संघ ठरला आहे. याआधी अशी कामगिरी कुठल्याही संघाला करता आलेली नाही. नाही म्हणायला २०१२मध्ये मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांनी प्रतिस्पर्धी संघांच्या मैदानात खेळलेले सात सामने जिंकले होते, मात्र त्यावेळी संघांची संख्या अधिक होती तसेच प्रत्येक संघ आठ सामने विरोधी संघाच्या मैदानात खेळत असे.

# मास्टर ॲथलेटिक्समध्ये उत्तम माने यांना कांस्यपदक

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीलंकेतील कोलंबो येथे झालेल्या ६५ वर्षांवरील मास्टर ॲथलेटिक्स स्पर्धेत नवी मुंबईच्या सानपाडा येथील उत्तम माने यांनी लांब उडीत कांस्यपदक पटकावले.



ॲफिलेटेड टू वर्ल्ड मास्टर ॲथलेटिक्स एशियन मास्टर श्रीलंका अथलेटिक्सच्या वतीने कोलंबो येथे ६५ वर्षांवरील नागरिकांसाठी मास्टर ॲथेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत भारतासह मलेशिया, इंडोनेशिया, श्रीलंका, मालदीव, म्यानमार, थायलंड आदी देशांच्या स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये उत्तम माने यांनी लांब उडीत स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. माने हे मूळचे सातारा जिल्ह्याच्या कराड तालुक्यातील गोंदी या गावचे रहिवासी आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते नवी मुंबईतील सानपाडा येथे वास्तव्याला आहेत. त्यांनी विविध ॲथेस्टिक स्पर्धेत एकूण १२८ पदके प्राप्त केली आहेत. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पंतसह लखनऊच्या सर्व खेळाडूंना दंड

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शेवटच्या लीग सामन्यात शतक केल्यानंतर लखनऊ सुपर जायंट्सचा कर्णधार ऋषभ पंत खूप आनंदी दिसत होता. त्याचा उत्साहही शिगेला पोहचला होता, पण या सामन्याचा निकाल त्याच्या बाजूने लागला नाही. इतकेच नव्हे तर सामन्यानंतर त्याला दंडदेखील भरावा लागला.

लखनऊमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्धच्या सामन्यात संघाच्या स्लो ओव्हर रेटसाठी लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतला ३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

लखनऊ संघाचा हा या हंगामातील तिसरा गुन्हा ठरला. ५ एप्रिल आणि २६ एप्रिल या दोन सामन्यांमध्येही पंतला षटकांची गती कमी राखल्याने दंड भरावा लागला होता. ओव्हर-रेट गुन्ह्यांशी संबंधित आयपीएलच्या आचारसंहितेनुसार पंतला तिसऱ्या चुकीसाठी ३० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे तसेच इम्पॅक्ट खेळाडूसह उर्वरित प्लेइंग इलेव्हन खेळाडूंना वैयक्तिकरित्या १२ लाख रुपये किंवा त्यांच्या मॅच फीच्या ५० टक्के (जे कमी असेल ते) दंड ठोठावण्यात आला आहे.

ऋषभ पंतचा हा तिसरा गुन्हा होता, पण असे असूनही त्याला निलंबित केले जाणार नाही. आयपीएल २०२४पर्यंत तिसऱ्या दंडानंतर एक सामन्याच्या बंदीचा नियम होता. आयपीएल २०२५मध्ये नियमात सुधारणा करण्यात आली, पण गेल्या वर्षीच्या शेवटच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या याच्यावर बंदीची कारवाई झाली होती. त्यामुळे ती शिक्षा दिली गेली. त्यानंतर नियमातील बदल लागू केले गेले.

# तीन जीवदानांचा फायदा घेत जितेशने आरसीबीला जिंकवले

**लखनऊ : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात कार्यवाहू कर्णधार जितेश शर्मा हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयाचा शिल्पकार ठरला. त्याने अवघ्या ३३ चेंडूत आठ चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ८५ धावांची खेळी केली. या सामन्यात जितेश शर्माला तीन वेळा जीवनदान मिळाले होते, ज्याचा त्याने फायदा करून घेतला

लखनऊचा फिरकीपटू दिग्वेश राठी गोलंदाजी करीत असताना त्याने बंगळुरूचा स्टँड इन कर्णधार जितेश शर्माचे मंकडिंग रनआऊट अपील केले होते. जितेशने क्रिज सोडले होते. त्यामुळे तो बाद झाला असता, परंतु लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतने दिलदारपणा दाखवत दिग्वेशचे अपील मागे घेतले. त्यामुळे जितेश शर्माला एक संधी मिळाली.

आरसीबीच्या डावातील १७व्या षटकात जितेश शर्माला आणखी एक जीवनदान मिळाले. या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर जितेशने स्वीप



लगावला. त्यावर आयुष बदोनीने अप्रतिम झेल टिपला, मात्र मैदानावरील पंचांनी तिसऱ्या पंचांकडे नो बॉल तपासण्याची विनंती केली. तो नो बॉल असल्याचे रिप्लेमध्ये दिसल्याने तिसऱ्या पंचांनी तसे जाहीर केले. परिणामी जितेश नाबाद राहिला.

लखनऊचा गोलंदाज विल ओरुर्केविरोधात खेळताना जितेशला आणखी एक जीवदान मिळाले. ओरुर्केचा चेंडू जितेशच्या बॅटच्या कडेला लागून मागच्या दिशेने गेला होता. त्यानंतर मयंक अग्रवाल धावला, मात्र जितेश जागेवरच उभा राहिला. तोवर क्षेत्ररक्षकाने चेंडू ओरुर्केकडे फेकला. तेव्हा जितेशला धावबाद करण्याची आयती संधी ओरुर्केकडे होती, मात्र तो चेंडू घेऊन स्टम्प्सच्या दिशेने धावताना पडला आणि चेंडू त्याच्या हातून निसटला. त्या संधीचा फायदा घेत जितेश नॉन स्ट्रायकर एंडच्या दिशेने धावला आणि त्याने त्याची धाव पूर्ण केली.

# एकाच सामन्यात विराटची दोन विक्रमांना गवसणी

**मुंबई : प्रतिनिधी**

लखनऊच्या इकाना क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सामन्यात चेज मास्टर विराट कोहलीने एकापाठोपाठ दोन खास विक्रमांना गवसणी घातली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाकडून नऊ हजार धावांचा टप्पा पार केल्यावर अर्धशतकाला गवसणी घालत त्याने ऑस्ट्रेलियन डेविड वॉर्नरचा विक्रम मोडीत काढला.

विराटने यंदाच्या हंगामातील आठवे अर्धशतक झळकावले. या खेळीसह त्याने आयपीएल स्पर्धेत सर्वाधिक अर्धशतके झळकवण्याचा विक्रम आपल्या नावे केला आहे. याआधी हा विक्रम वॉर्नरच्या नावे होता, ज्याने आयपीएलच्या कारकिर्दीत ६२ अर्धशतके झळकवली आहेत.

आरसीबीच्या डावातील दहाव्या षटकातील आकाश महाराज सिंगच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारत विराटने विक्रमी अर्धशतक साजरे केले.



यंदाच्या हंगामात आठ अर्धशतके झळकवणाऱ्या विराटने धावांचा पाठलाग करताना झळकावलेले हे पाचवे अर्धशतक ठरले. याआधी कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध धावांचा पाठलाग करताना त्याने ३६ चेंडूत ५९ धावांची नाबाद खेळी केली होती. राजस्थान रॉयल्सविरुद्ध त्याच्या भात्यातून ४५ चेंडूत ६२ धावांची खेळी पहायला मिळाली. पंजाब किंग्जविरुद्धही त्याने ५४ चेंडूत नाबाद धावांची खेळी केली होती. दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध ४७ चेंडूतील ५१ धावा केल्या. सनरायझर्स हैदराबादविरुद्ध त्याने २५ चेंडूत ४३ धावांची खेळी करीत चेज मास्टरचा रूबाब दाखवून दिला आहे.

# धडाकेबाज वैभव सूर्यवंशी ठरला नंबर १

**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सचा धडाकेबाज फलंदाज वैभव सूर्यवंशी सध्या चर्चेत आहे. अवघ्या १४व्या वर्षी त्याने सर्वात स्पर्धात्मक समजल्या जाणाऱ्या आयपीएलमध्ये पदार्पण केले आणि आपला ठसा उमटवला. प्लेऑफसाठी पात्र ठरलेल्या गुजरात टायटन्स संघाविरोधात वैभव सूर्यवंशीने दणकेबाज शतक ठोकले होते तसेच इतरही सामन्यात सलामीला येत त्याने दमदार फटकेबाजी दाखवून दिली होती. त्याच्या याच फटकेबाजीच्या जोरावर त्याला जगातील ५८ फलंदाजांमध्ये सर्वोत्तम ठरण्याचा मान मिळाला आहे.

५८ फलंदाजांमध्ये वैभव सूर्यवंशी ज्या गोष्टीमुळे वेगळा ठरलाय, ते म्हणजे त्याच्या शतकातील चौकार-षटकारांची टक्केवारी. १४ वर्षीय डावखुऱ्या फलंदाजाने खझङ २०२५ मध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध फक्त ३५ चेंडूत शतक झळकावले. वैभव सूर्यवंशीने गुजरात टायटन्सविरुद्ध २६५.७८च्या स्ट्राईक रेटने ३८ चेंडूत १०१ धावा केल्या, ज्यामध्ये ७ चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता. म्हणजेच त्याने त्याच्या शतकात फक्त चौकार-षटकारांच्या मदतीने ९४ धावा केल्या.

जर चौकार षटकारांच्या टक्केवारीची गोष्ट केली तर वैभव सूर्यवंशीने त्याच्या शतकादरम्यान त्याच्या ९३ टक्के धावा फक्त चौकार आणि षटकार मारून केल्या, जो एक विक्रम आहे. वैभव सूर्यवंशीने या बाबतीत त्याचाच संघातील सहकारी आणि सलामीचा जोडीदार यशस्वी जयस्वालचा विक्रम मोडला आहे. २०२३ च्या आयपीएलमध्ये जेव्हा यशस्वी जैस्वालने मुंबई इंडियन्सविरुद्ध शतक झळकावले होते तेव्हा त्याच्या ९० टक्के धावा चौकार-षटकारांनी झाल्या होत्या.

या यादीत सूर्यवंशी आणि जैस्वाल यांच्यानंतर श्रीलंकेचा माजी सलामीवीर सनथ जयसूर्या तिसऱ्या, तर ॲडम गिलख्रिस्ट चौथ्या स्थानी आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com